शनिवार
३ मे १९८०
७५ पैसे

# माणूस

## हे प्रश्न विचारण्यापलीकडे मी तरी काय करू शकतो ?

India that is Bharat,
आर्यावर्त, जंबुद्वीप किंवा
हिंदुस्थान
या आमच्या देशा
तू फुटणार आहेस का ?
तुझे तुकडे तुकडे होणार आहेत कां ?
दुर्दैवाने याचे उत्तर ' होय '
असे असेल तर
एक उपकार कर
आधी आमचेच तुकडे कर !
मागे एकजण असेच म्हणाला
त्याला तू सफाईने फसविलेस !
त्याच्या स्वप्नाच्या ठिकऱ्या केल्यास
स्वतःचे तुकडे पाडून !
त्या चुकीची फळे
अजून भोगतोयस.
मग तीच चूक
परत करायचा हट्ट
धरून का बसला आहेस ?
अजून शहाणा हो !
तुटलेले तुकडे जोडून घ्यायची प्रक्रिया सुरू कर !
हजार वर्षे
खोलवर गेलेल्या जखमा
बऱ्या करून घेणे, हा तुझा गुण आहे.
मग तीस वर्षांपूर्वीची जखम
भरून निघायला कितीसा काळ लागेल ?
का
वेळेवर सावध न होणे
हा तुझा सनातन ' दुर्गुण '
तू अजूनही कवटाळणार आहेस ?
मला सांग.
हे प्रश्न विचारण्यापलीकडे
मी तरी काय करू शकतो ?
काही करू शकत असलो
तर ते सांग......
□

संपादक माणूस
स. न. वि. वि.

ईशान्य भारत अभ्यासदौऱ्यावरून हे पत्र व पुढच्या प्रवासासाठी ट्रकची वाट पाहताना हायवेच्या कडेच्या एका टपरीत बसून लिहिलेल्या (वरील) चार ओळी पाठवीत आहे. सर्व काही पाहिल्यावर, पाहत असताना जबरदस्त तडफड होते......

विनय सहस्रबुद्धेचे लेखांक **(अस्वस्थ आसाम)** इकडे फारच प्रसिद्ध झाले आहेत. लोक त्याचे अनुवाद वगैरे मागतात. ' माणूस 'चे नावही अनेकांच्या कानांवर गेले आहे.

बाकी ठीक.

इंफाळ–कोहिमा–आसाममधल्या बातम्या वृत्तपत्रातून वाचत असाल. इथं राहून त्याचा जिवंत अनुभव घेतो आहे.

–अविनाश
२१।४।८०

**' अस्वस्थ आसाम ' लेखमालेचा उत्तरार्ध..चालू अंकापासून**

# निवडणूक-चित्र

## महाराष्ट्र व गुजराथ

वा. दा. रानडे

विधानसभा निवडणुकांत १९७७ एवढे यश विरोधी पक्षांना या वेळी फाटाफुटीमुळे मिळण्याची शक्यता नाही हे स्पष्टच आहे. इंदिरा कॉंग्रेसला विजय मिळणार तो लोकसभा निवडणुकीएवढाच मोठा असणार की, १९७२ च्या विधानसभा निवडणुकांसारखा असणार की त्यापेक्षा कमी असणार हे समझोते करण्यात विरोधी पक्षांना कितपत यश येते, त्यावर अवलंबून आहे. लोकदल, जनता पक्ष, भारतीय जनता पक्ष, अरस कॉंग्रेस आणि डावे गट यांच्यात समझोता झाला तर उत्तर प्रदेश, बिहार आणि राजस्थान या तीन राज्यांत इंदिरा कॉंग्रेसला बहुमत मिळविणेही कठीण जाईल, हे लोकसभा निवडणुकांवरून स्पष्ट झाले आहे.

१९७२ च्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या वेळी दोन राज्यातील राजकीय चित्रांचा विचार करीत आहे. महाराष्ट्रात अविभक्त कॉंग्रेसने १९७२ च्या निवडणुकांत २२२ जागा जिंकल्या होत्या. तोपर्यंतच्या निवडणुकांतील यशाचा तो उच्चांक होता; पण या वेळी त्या यशालाही आपण मागे टाकू असा विश्वास इंदिरा कॉंग्रेसच्या गोटातून व्यक्त केला जात आहे. कॉंग्रेसमधील फुटीनंतर १९७८ च्या विधानसभा निवडणुकांत चव्हाण कॉंग्रेसने ६९ व इंदिरा कॉंग्रेसने ६२ जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर चव्हाण कॉंग्रेसमध्ये आणखी फाटाफूट होऊन इंदिरा कॉंग्रेसचे बळ वाढत गेले. जिल्हा परिषद निवडणुकांत इंदिरा कॉंग्रेस सर्वांत मोठा पक्ष म्हणून निवडून आला आणि गेल्या लोकसभा निवडणुकीत तर महाराष्ट्रात चव्हाणांचा प्रभाव संपून ४८ पैकी ३९ जागा एवढे मोठे यश इंदिरा कॉंग्रेसने मिळविले. चव्हाणांना फक्त त्यांची स्वतःची एक जागा टिकवता आली. कॉंग्रेसचे अनुयायी फार मोठ्या संख्येने इंदिरा कॉंग्रेसकडे झुकले आहेत ही वस्तुस्थिती मान्य करायला हवी. असे असताही चव्हाण-पवारांची कॉंग्रेस या वेळच्या निवडणुका स्वतःच्या बळावर लढवणार आहे. फार तर काही थोड्या ठिकाणी स्थानिक समझोते होतील. एका बाजूला पवार कॉंग्रेस स्वतःच्या बळावर निवडणुका लढवीत आहे तर दुसऱ्या बाजूला भारतीय जनता पक्षाने म्हणजे पूर्वीच्या जनसंघाने तशीच भूमिका घेतली आहे. काही थोडे शहरी भाग वगळता महाराष्ट्रात जनसंघाचे बळ फारसे नाही. इंदिरा कॉंग्रेसविरुद्ध महाराष्ट्रात पुलोदसारखी आघाडी पुनः निर्माण करता आली तरच प्रभावी लढत देणे शक्य आहे. विरोधी पक्षांना अजूनही त्या दिशेने प्रयत्न करायला हवेत ! महाराष्ट्रात अविभक्त कॉंग्रेसला १९७२ मध्ये ५६·३२ टक्के मते मिळाली होती. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा त्यात सात टक्के घट होती. या वर्षाच्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा कॉंग्रेसने ५३ टक्के मते मिळविली याचा अर्थ मतांच्या दृष्टीने महाराष्ट्रात १९८० ची इंदिरालाट १९७१–७२ पेक्षा थोडी कमी प्रभावी होती; पण विरोधी पक्ष विस्कळित असल्याने इंदिरा कॉंग्रेसला मतांच्या तुलनेने खूपच जागा अधिक प्रमाणात मिळाल्या. मते ५३ टक्के तर जागा ८१·२५ टक्के मिळाल्या. १९७२ मध्ये मते ५६ टक्के तर जागा ८२ टक्के मिळाल्या होत्या. विरोधी पक्षांनी समझोते केले नाहीत तर १९७२ सारखे असेच मोठे यश इंदिरा कॉंग्रेसला मिळण्याची शक्यता आहे.

गुजरातमध्ये १९७२ च्या विधानसभा निवडणुकात अविभक्त कॉंग्रेसला ५०·५६ टक्के मते व १३९ म्हणजे ८२ टक्के जागा मिळाल्या होत्या. महाराष्ट्रापेक्षा सहा टक्के कमी मते मिळूनही जागा मात्र महाराष्ट्रा-

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : एकूणपन्नासावा
५ मे १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

त्याच प्रमाणात अविभक्त काँग्रेसने मिळविल्या होत्या. विरोधी पक्ष विस्कळित असल्याचा फायदा त्या वेळी अविभक्त काँग्रेसला मिळाला होता; पण पहिल्या इंदिरा लाटेतील इंदिरा काँग्रेसचा पाठिंबा तीन वर्षांतच कमी होऊन १९७५ च्या विधानसभा निवडणुकांत काँग्रेसचा पराभव झाला. विरोधी पक्षांनी जनता मोर्चा या नावाने संयुक्त आघाडी त्या वेळी उभारली होती. या जनता मोर्चालाही निर्णायक बहुमत मिळाले नाही; पण सर्वांत अधिक जागा मिळाल्या आणि चिमणभाई पटेल यांच्या किमलोप (किसान मजदूर लोकपक्ष) पक्षाचे पाठिंब्याने जनता मोर्चाने मंत्रिमंडळ बनविले. निवडणुकीत एकूण १८२ जागांपैकी जनता मोर्चास ८७, काँग्रेसला ७५ व किमलोप पक्षास १२ जागा मिळाल्या. आठ अपक्ष उमेदवार निवडून आले. जनता मोर्चामध्ये संघटना काँग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल, समाजवादी व नॅशनल लेबर पार्टी हे पक्ष सामील झाले होते. जनता मोर्चास मिळालेल्या जागांची घटकवार विभागणी पुढीलप्रमाणे होती. संघटना काँग्रेस ५७, जनसंघ १८, भारतीय लोकदल २, समाजवादी २, नॅशनल लेबर पार्टी १, पुरस्कृत अपक्ष ६. यावरून जनता मोर्चात संघटना काँग्रेस हाच प्रमुख पक्ष होता. याच संघटना काँग्रेसला १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत अवघ्या १६ जागा मिळाल्या होत्या. १९७५ च्या निवडणुकांत त्यांच्या जागा वाढल्या त्या संयुक्त मोर्चामुळेच. जनसंघाच्या जागाही संयुक्त मोर्चामुळेच ३ वरून १८ पर्यंत वाढल्या. गुजराथेतील भारतीय लोकदल पक्ष मुख्यत: पूर्वीच्या स्वतंत्र पक्षातूनच बनला. स्वतंत्र पक्षास १९७२ मध्ये एकही जागा मिळाली नव्हती. १९७२ मध्ये एकही जागा न मिळालेल्या इतर पक्षांपैकी समाजवाद्यांनी दोन व नॅशनल लेबर पार्टीने एक जागा १९७५ मध्ये मिळविली. दोन्ही कम्युनिस्ट पक्षांना १९७२ प्रमाणे १९७५ मध्ये एकही जागा मिळाली नाही. काँग्रेसमधून फुटलेले चिमणभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली किसान मजदूर लोकपक्ष हा प्रादेशिक पक्ष १९७५ च्या निवडणुकीत प्रथमच स्थापन झाला होता. त्याने १२ जागा मिळविल्या आणि कोणत्याच पक्षास निर्णायक बहुमत न मिळाल्यामुळे त्याच्या पाठिंब्याला महत्त्व आले.

१९७१ च्या लोकसभा निवडणुकीचे वेळी गुजरातेत पहिल्या इंदिरा लाटेचा प्रभाव विशेष जाणवला नाही. एकूण २४ जागांपैकी सत्तारूढ काँग्रेसला ११, संघटना काँग्रेसला ११ व स्वतंत्र पक्षाला २ जागा मिळाल्या. दोन्ही काँग्रेस पक्षांना जागा सारख्याच मिळाल्या असल्या तरी मते सत्तारूढ काँग्रेसला ४४.८५ टक्के व संघटना काँग्रेसला ३९.७० टक्के मिळाली. स्वतंत्र पक्षाला ५.४६ टक्के मते मिळाली. विरोधी पक्षांना दोन जागा जास्त मिळाल्या असल्या तरी मतांच्या दृष्टीने काँग्रेस व विरोधी पक्ष तुल्यबळ होते. गुजरातेत इंदिरा लाट एक वर्षानंतर म्हणजे १९७२ च्या विधानसभा निवडणुकीचे वेळी आली. या निवडणुकीत काँग्रेसने ५६ टक्के मते आणि १३९ म्हणजे ८२ टक्के जागा मिळविल्या. विरोधी पक्षांनी आपले घटलेले बळ १९७५ च्या विधानसभा निवडणुकीत संयुक्त मोर्चा उभारून वाढविले व राज्याची सत्ता मिळविली.

इतर राज्ये व गुजरात यांच्या या वेळच्या विधानसभा निवडणुकांतील एक फरक म्हणजे इतर राज्यांत तीन वर्षांनी निवडणुका होत आहेत तर गुजरातेत पाच वर्षांनी होत आहेत. या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकांत तेथे इंदिरा काँग्रेसने २६ पैकी २५ जागा जिंकल्या. जनता पक्षाला फक्त एक जागा मिळाली. इंदिरा गांधींनी महाराष्ट्रात चव्हाणांचा प्रभाव संपविला तसा गुजरातेत मोरारजीभाईंचा संपविला. विरोधी पक्षांचा संयुक्त मोर्चा या वेळी नाही. लोकसभा निवडणुकीपेक्षाही विरोधी पक्ष अधिक विस्कळित झालेले आहेत आणि त्याचा फायदा मिळून इंदिरा काँग्रेस १९७२ पेक्षाही मोठे यश या वेळी मिळविण्याची शक्यता आहे.

या दोन्ही राज्यांत इंदिरा काँग्रेसला विजय मिळाला तरी स्थैर्य लाभेलच असे नाही. कारण तिकिटवाटपातच त्या पक्षातील गटबाजीचे एवढे प्रदर्शन झाले आहे की ही गटस्पर्धा स्थिरता लाभू देणार नाही. □


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....
**नाझी भस्मासुराचा उदयास्त**
लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# प्रकाश येथील विज्ञानजत्रेचा यशस्वी उपक्रम

पुरुषोत्तम पानसे

दि. ६ एप्रिलची, (१९८०) संध्याकाळ : धुळे जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील प्रकाश या छोटया गावात भरलेल्या विज्ञानजत्रेचे सूप वाजणार होते. अंधार पडू लागला तरी लोक येतच होते. जत्रेमध्ये विजेचे कनेक्शन असूनही लहरी वीजपुरवठयामुळे जत्रा बराचसा वेळ अंधारात असे. मेणबत्तीच्या उजेडात एकेका चित्राजवळून स्वयंसेवक आणि पंधरा-वीस माणसांचा घोळका सरकत होता. केवळ शेवटच्या दिवशी नव्हे तर रोजच अंधार पडायच्या वेळी असे चित्र दिसायचे.

**एक वेगळा प्रयत्न :** दि. ३१ मार्च ते दि. ६ एप्रिलपर्यंत भरलेली ही विज्ञानजत्रा लोकविज्ञान चळवळीने शहादा भागातील श्रमिक संघटनेच्या सहकार्याने भरवली होती. खेडविभागात जत्रा फार लोकप्रिय असते. जत्रा या स्वरूपात विज्ञानप्रदर्शनाचा कार्यक्रम केला तर तो अधिक लोकांपर्यंत पोहचेल या उद्देशाने ही आगळी जत्रा भरवण्यात आली होती. लोकविज्ञान चळवळीचा हा पहिलाच मोठा कार्यक्रम. अर्धशिक्षित जनतेपर्यंत विज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोन पोचण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत अशी जाणीव झालेले वैज्ञानिक व काही सामाजिक कार्यकर्ते यांनी मिळून ' लोकविज्ञान-चळवळ ' सुरू केली आहे. ही विज्ञानजत्रा भरवण्याचा निर्णय पाच महिन्यांपूर्वी घेतला होता व लोकविज्ञान-चळवळीची उद्दिष्टे, विज्ञानजत्रेचा आगळा प्रयोग इ. बाबी अधिकाधिक वैज्ञानिकांना पटवून देऊन त्यांचा सक्रिय सहभाग मिळवण्याचे पद्धतशीर प्रयत्न करण्यात आले व त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. निरनिराळया संस्थांतील वैज्ञानिकांनी विज्ञानजत्रेसाठी देणग्या दिल्या. काहींनी इतर प्रकारचे सहकार्य केले. विज्ञानप्रसाराचे काम करणाऱ्या काही संस्था आहेत; पण त्या मुख्यत: मध्यमवर्गीयांपर्यंत पोहोचल्या आहेत. अशिक्षित, अर्धशिक्षित जनतेच्या जीवनातील प्रश्न घेऊन त्या प्रश्नांवर शास्त्रीय माहिती, विश्लेषण पुरवणे हे लोकविज्ञान-चळवळीचे उद्दिष्ट अनेक वैज्ञानिकांना स्फूर्तिदायक वाटले व त्यामुळे त्यांनी मनापासून सहकार्य दिले.

**मनोरंजन आणि विज्ञान :** जत्रेचा तंबू संपूर्णपणे स्थानिक लोकांनी व स्वयंसेवी पद्धतीने उभा केला होता. निरनिराळया गावांतून काठ्या, तरटे गोळा केली होती. तापीनदीत मासेमारी करणाऱ्या कोळयांनी आपली जाळी मंडपासाठी देऊ केली होती. या भागामध्ये आदिवासी बहुसंख्येने आहेत. त्यांची बोली मराठी नसून भिलोरी आहे, म्हणून जत्रेतील निरनिराळया दालनात आदिवासी स्वयंसेवक ठेवण्यात आले होते व ते भिलोरी भाषेत चित्रे, मॉडेल्स लोकांना समजावून सांगत होते. आदिवासींच्या जीवनातली उदाहरणे घेऊन, निरनिराळया प्रकारचे विषय खुलवून सांगण्याची स्थानिक कार्यकर्त्यांची हातोटी विलक्षण होती. शहरी कार्यकर्ते त्यांच्यापुढे पार फिके पडले होते !

जत्रा आणि मनोरंजन यांचे नाते अतूट आहे. पहिल्याच विभागात वैज्ञानिक तत्त्वावर आधारलेली काही खळणी होती. स्टॉलच्या बाहेरच दोरीवर कसरत करणारा डोंबारी (प्लास्टिकचा) सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. एक चौकोनी काचेचा तुकडा कागदासमोर धरताच कागद पेट घेत होता हे पाहून प्रेक्षकांचे डोळे विस्फारले जात होते. मग हा काचेचा तुकडा म्हणजे एक विशिष्ट प्रकारचे अत्यंत प्रभावी भिंग होते व त्यातून सूर्याचे किरण एका ठिकाणी गोळा होऊन सूर्यकिरणांची उष्णता एकवटली जाते हे स्पष्ट करण्यात येत होते. कुटण्याच्या यंत्राचे खेळणे, हवेत तरंगणारा बुवा या गंमतशीर खेळण्यांमार्फत मनोरंजनाबरोबर शास्त्रीय तत्त्वेही लोकांपर्यंत पोचविण्यात येत होती.

पुढचा विभाग होता दृष्टिभ्रमावर. कधी कधी आपलेच डोळे आपल्याला कसे फसवतात याचा प्रत्यय देणारे हे दालन होते. विज्ञान हे नुसते डोळयांवर विश्वास ठेवत नाही तर जे दिसते ते मोजमापाने व इतर मार्गांनी पडताळून पाहते हे या दालनामार्फत ठसविण्याचा प्रयत्न करण्यात येत होता.

**जिव्हाळयाचे प्रश्न :** पाणी हा ग्रामीण भागातील अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न. म्हणून पाण्यासंबंधी शास्त्रीय माहिती देणारा विभाग आयोजित करण्यात आला होता. पाऊस कसा पडतो, (की ज्याबद्दल आदिवासींमध्ये बऱ्याच गैरसमजुती आहेत.) जलचक्र, भूजलपातळी, विहिरी कशा व कोठे लागतात यासंबंधी माहिती रंगीत चित्रे व प्रतिकृती यांच्या साहाय्याने देण्यात येत होती. तांत्रिक माहितीबरोबरच याविषयीच्या सामाजिक प्रश्नांबाबतही शास्त्रीय पायावर मांडणी केली जात होती. उदा. एका डोंगराची प्रतिकृती करण्यात आली होती. डोंगरउतारावरच्या वस्तीवरील दोन विहिरींचा छेद एका बाजूने दिसत होता. एक सवर्णांची व एक दलिताची विहीर; पण जमिनीतील भूजलपातळीवरून तर असे दिसत होते की, जमिनीच्या पोटातून त्या दोन्ही विहिरींचे पाणी जोडलेले होते. म्हणजे जमिनीवर कितीही शिवाशीव पाळली तरी व्यर्थच ! निसर्गाच्या पोटात सर्व प्रवाह एक होतात हे या प्रतिकृतीतून स्पष्ट होत होते. तसेच जंगलाचे महत्त्व, जंगलतोडीमुळे होणारे नुकसान, जंगलतोडीला जबाबदार असणारे सरकारी धोरणे हेही चित्रांद्वारे स्पष्टकरण्यात येत होते.

अन्नातील भेसळ या दालनात निर-

निराळ्या अन्नपदर्थात कोणकोणती भेसळ केली जाते व ती विज्ञानाच्या आधारे कशी हुडकून काढता येते ते रंगीत चित्राद्वारे दाखवले जात होते. पुढच्या विभागात पृथ्वी, चंद्र, सूर्य यांच्या भ्रमणकक्षा दाखवून त्यामार्फत दिवस, रात्र, अमावास्या, पौर्णिमा, सूर्यग्रहण इ. चे 'रहस्य' उलगडून दाखवण्यात येत होते. संपूर्ण सूर्यमालिकेची माहिती देणारी चित्रेही ठेवण्यात आली होती. रमण म्युझिम, नागपूर, यांनी दिलेल्या दुर्बिणीतून रात्री आकाश न्याहाळण्यात आदिवासींना गंमत वाटत होती. 'पैसा फेको तमाशा देखो' च्या धर्तीवर पण एकाच वेळेस अनेकांना पाहाता येईल अशी चित्रमालिका 'ग्रहण लागलंय ग्रहण' या गाण्याच्या लयीत दाखवण्यात येत होती. 'ज्ञानसूर्याला ग्रहण लागले आहे. सर्वसामान्य जनता विज्ञानाला मुकली आहे. आज विज्ञान हे मूठभरांसाठीच आहे. लोकविज्ञानचळवळीच्या सहाय्याने अज्ञान दूर करू, विज्ञानाची सूत्रे आपल्या हातात घेऊ, मग हे ग्रहण सुटेल!' अशा अर्थाचे हे गाणे व चित्रमालिका होती. ज्या स्कायलॅबमुळे या भागातही प्रचंड घबराट पसरली त्या स्कायलॅबचे मॉडेलही या दालनात ठेवले होते. 'असं असतंय व्हय स्कायलॅब' असे म्हणून मंडळी सुटकेचा निश्वास (आता!) टाकत होती;

## सूर्यशेगड्या

पलीकडे ठेवलेल्या सूर्यशेगड्या खळवळ माजवीत होत्या. एका छत्रीच्या आतल्या बाजूला ॲल्युमिनाइज्ड प्लास्टिक चिकटवून तयार केलेली सूर्यशेगडी गर्दी खेचत होती. तिच्यावर शिजविलेल्या भाताची चव काही वेगळी लागते का ते काहीजण बघत होते. जणू काही सूर्य आपल्या मुठीत आला आहे अशा अभिमानाने दोन आदिवासी स्वयंसेविका सूर्यशेगड्यांबद्दल माहिती सांगत होत्या. स्थानिक कारागिराला बनवता येतील अशा या सूर्यशेगड्या आहेत. त्यामुळेच त्यांच्याबद्दल खोलात चौकशी केली जात होती. सूर्यशेगडीमुळे बायकांच्या धुराचा, लाकूड-फाटा गोळा करण्याचा त्रास वाचेल म्हणूनही कदाचित एवढे कुतूहल असावे.

नंतरचे दालन आरोग्याचे. निरनिराळे शरीराचे भाग दाखवणारी प्रतिकृती, हाडांचा सापळा, निरनिराळ्या रोगांबाबतची चित्रे यांच्या सहाय्याने आरोग्याबद्दल माहिती दिली जात होती. त्यावर एक नाटक व एक गाणे बसवले गेले होते. त्यामुळे ज्ञानाचा डोस जड जात नव्हता. स्त्रीचे शरीर व आरोग्य हा विभाग लोकविज्ञान चळवळीतील स्त्री-कार्यकर्त्यांच्या आग्रहानुसार बनवण्यात आला होता. या विषयावर अशा ठिकाणी माहिती देण्याचा हा पहिलाच प्रयोग. आदिवासी स्त्रियांच्या मनावरील दडपण दूर करणे कठीण जात होते; पण विषय जिव्हाळ्याचा असल्याने व फक्त स्त्रियांना या दालनात प्रवेश असल्याने आदिवासी स्त्रिया तोंडावर पदर घेऊन, लाजत, हसत पण लक्षपूर्वक ऐकत होत्या. मासिक पाळी, गर्भधारणा, (गर्भाच्या निरनिराळ्या अवस्थांचे प्रत्यक्ष नमुने बाटल्यांतून ठेवण्यात आले होते) गर्भारपणी घ्यावयाची काळजी, कुटुंबनियोजन इ. बद्दल शास्त्रीय माहिती चित्रांद्वारे समजावून सांगण्यात येत होती. काही बायकांनी मात्र 'असली' माहिती ऐकण्याचे नाकारले.

विज्ञानजत्रेतील सर्वांत 'पॉप्युलर' विभाग म्हणजे बुवाबाजीवरील दालन होय. संत गाडगेबाबांनी मूर्तिपूजा, अवडंबर या विरुद्ध सांगितलेले मजेशीर युक्तिवाद काही पोस्टर्समार्फत मांडले होते. डॉ. कोवूर यांच्या 'बिगॉन गॉडमेन' या पुस्तकावर आधारित काही बुवाबाजीबद्दलचे अनुभव चित्ररूपाने मांडले होते. याच दालनात बुवा बनलेला एक कार्यकर्ता होता. मनातील आकडा ओळखणे, जटेतून गंगा काढणे, जादूने रक्ताची धार काढणे असले चमत्कार तो करून दाखवीत होता. मग त्या प्रयोगातील हातचलाखी, वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग याबद्दल माहिती देऊन त्यात दैवी चमत्कार वगैरे काही नाही हे दाखवून देत होता. हा प्रयोग खूपच रंगायचा!

एका रात्री बुवाबाजीवर एक नाटकवजा जाहीर प्रयोग सादर करण्यात आला व नंतर बुवाबाजीवर नागपूरचे डॉ. पांडे यांचे भाषण झाले. स्टेजवर भगवी कफनी घातलेला एक साधू स्थानापन्न झालेला. त्याच्या भक्तगणांची भजने चालू. एकाएकी रस्त्यावरून ढोल वाजू लागला. लोक चकित होऊन बघतात तो एका बाईच्या अंगात आलेले! सात-आठ बायका तिला धरत-सावरत आणतात. या बाईच्या अंगातले भूत काढण्याची साधूला विनंती करण्यात येते. तो बरेच पैसे घेतो; पण त्याला जमत नाही. इतक्यात प्रेक्षकातून डॉ. पांडे उठून 'ही सर्व भोंदूगिरी आहे' असे सांगत स्टेजवर येतात. बाईच्या अंगात येण्याचे कारण वेगळेच आहे. तो एक मानसिक रोग आहे व तो शास्त्रीय पद्धतीने बरा करता येतो' असे समजावून सांगतात. साधुमहाराजांचे इतर चमत्कारही खोटे पाडतात!

नेहरू सायन्स सेंटर, मुंबईची मंडळी आपले विश्व, जलचर प्राणी, मासे, रॉकेट इ. विषयांवर रोज रात्री 'पिक्चर' दाखवीत. त्याला अर्थातच अख्ख्या प्रकाश गावातील लोक लोटत असत. तसेच जत्रा पाहण्यास आलेली काही दूर गावची मंडळी रात्री 'शिणमा' बघायला थांबत. तर अशी ही विज्ञानजत्रा. मिरजेपासून मूर्तिजापूरपर्यंतच्या निरनिराळ्या शाळांनी निरनिराळी मॉडेल्स देऊन तर इतर संस्थांनी इतर प्रकारे मदत केली. स्थानिक कार्यकर्त्यांना तर उत्साह प्रचंड होता. आदिवासींच्या जीवनात समूहगीतांचे स्थान मोठे आहे. विज्ञानयात्रेवर आदिवासी कार्यकर्त्यांनी लगेच गाणी बसविली.

सोम्या रे गोम्या
पोरा अन सोरा
चला चला विज्ञानजत्रा पहायला

असे म्हणत लोक टोळ्याटोळ्यांनी विज्ञानजत्रा बघायला येत होते. अंधश्रद्धेच्या स्टॉलवर खालील गाणे बसविले गेले होते.

देव देव म्हणून नवस केला
नाही रे त्याचा उपयोग झाला
आम्ही फसलो र फसलो अज्ञानात!
जादूटोण्याचा विचार सोडा
खऱ्या गोष्टींना शोधून काढा,
आधार घेतला र घेतला विज्ञानाचा।

लोकविज्ञानचळवळीला जत्रेचा अनुभव नक्कीच उत्साहवर्धक होता. या जत्रेच्या अनुभवावरून योग्य त्या सुधारणा करून यापुढे असे छोट्या प्रमाणावर कार्यक्रम घ्यायचे ठरत आहे. त्याला सक्रिय मदत करावी असे आवाहन समाजाभिमुख विज्ञानप्रेमी मंडळींना करत आहोत.

संपर्काचा पुण्यातील पत्ता—
'लोक–विज्ञान चळवळ',
द्वारा ब्रह्मे ग्रंथालय,
१२५९/२, जंगलीमहाराज रोड,
कॅनरा बँकेच्यावर, तिसरा मजला,
पुणे–४११ ००४ □

# सूर्यग्रहण

सूर्य त्यांच्या दयेवर जगत असल्यासारखा
सूर्याला वाचवण्यासाठी
त्यांनी यज्ञ केले !
तिकडे बुध-शुक्राचे संशोधन झाले
अन् इकडे
डोळे जाणार म्हणून
अफवांचे पीक आले.
तिकडे सूर्यावर उफाळणारे
तेजोमेघ शोधले
अन् इकडे
काळ्या सूर्याचे तोंड बघायचे नाही
म्हणून घरात बसले
तिकडे घारी-गिधाडांवर, घोड्या-गाढवांवर
रोग्या-महारोग्यांवर प्रयोग केले
अन् इकडे
सनातनी बामनांनी होम केले
डबेच्या डबे तूप जाळले
दे दान सुटे गिऱ्हाण
म्हणून
कोणी पोटाचे गिऱ्हाण सोडण्यासाठी
सूर्याला दुव्वा देऊन भीक मागितली
सूर्यग्रहण सुटल्यावर
खुर्चीला वाचवल्याच्या नशेत
कोणी गंगास्नान केले

आता यज्ञ करणाऱ्या
आणि भीक मागणाऱ्या
सर्वच भडव्यांचे संदर्भ घेऊन
सूर्य निघालाय
ज्यांचे त्यांना बक्षीस देण्यासाठी

× × ×

विज्ञानाने सूर्याला आव्हान केले
प्लेटो-नेपच्यूनला खेचून आणले
यंत्रयुगाने
वाळूतून तेल काढले
निर्जन डोंगराचे नंदनवन केले
शेतेच्या शेते भदरून काढली
हवेवर पीक काढले
पुरुषाची स्त्री केली
स्त्रीचा पुरुष केला
बाटलीत बाळ काढले
आणि आमच्या सनातनी भारतीयांनी
सूर्याला वाचवण्यासाठी
गिऱ्हाणात होम केले.

—पाटीलबुवा आंधळे

# विज्ञान म्हणजे काय? एका शोधाची कहाणी

मूळ लेखक : ए. के. रॉय । अनुवाद : माधव दातार

अकरा वर्षांपूर्वी कोयनानगरला भूकंप झाला. भूकंपाच्या या धक्क्याने इमारती कोसळल्या, लोकांमध्ये घबराट उत्पन्न झाला व कोयनेच्या सुप्रसिद्ध धरणात एक भेग निर्माण झाली. एवढेच नव्हे तर मुंबईला तंत्रशास्त्राचा अभ्यास करणारी आमच्यापैकी काही मंडळीही अस्वस्थ होऊन गेली. त्या वेळी जर आम्हाला कुणी विज्ञान म्हणजे काय, असा प्रश्न केला असता तर आम्ही बहुधा त्याच्याकडे दयार्द्र नजरेने पाहून हसलो असतो. आमच्या दृष्टीने हा भूकंप म्हणजे नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यास मानव अद्यापी तयार झालेला नाही याचा पुरावा होता आणि विज्ञानाचे कार्य लोकांना ज्ञान देणे हेच असू शकत होते. आमच्या मते यावरील उपाय स्पष्ट होता व तो म्हणजे भूकंपाचा धक्का सहन करू शकतील अशा इमारती बांधणे. म्हणून सर्व तयारीनिशी व आत्मविश्वासाने आम्ही कोयनापरिसरात जाऊन एक मजबूत शेड बांधली. या प्रकाराला खूपच प्रसिद्धी मिळाली व आमच्या या कौतुकाने धुंद होऊन आमच्या कार्याची उपयोगिता पाहण्याचे आम्ही विसरूनच गेलो. उपयोग करण्यासाठी काही बांधकाम केल्यावर त्याचा उपयोग कितपत होतो हे पाहणेही आवश्यक असते, इकडे आम्ही दुर्लक्षच केले. हे शहाणपण आम्हाला उशीरा–खूपच उशीरा–सुचले. आपण सर्वजण आपल्या चुकांपासून पण संथपणे शिकतो. विज्ञानाचे नक्की स्वरूप काय हा प्रश्न विचारण्यास आम्ही कसे शिकलो याची ही हकीगत आहे. आपण आपल्या स्वतःच्याच चुकांपासून शिकले पाहिजे हे आवश्यक नाही. आपण दुसऱ्यांच्या चुकांपासूनही सावध होऊ शकतो, या हकीगतीतील 'आम्ही' त्याच व्यक्ती नव्हतो. व्यक्ती बदलत गेल्या; पण निरनिराळ्या व्यक्तींचे परिस्थिती जाणून घेण्याचे व शिकण्याचे हे एकत्रित अनुभव इतरांना महत्त्वाचे वाटतील.

कोयनापरिसरातील आमच्या 'यशस्वी' कार्यामुळे आम्ही अगदी निर्धास्त होतो व पुढील वर्षी पुण्याजवळील एका खेड्यात विकास-कार्यासाठी–अर्थात आमच्या मनातील विकासाच्या कल्पनेनुसार–गेलो. कोयनेला जर भूकंपाचा परिणाम न होणारी इमारत आपण बांधू शकलो तर अज्ञानी खेडुतांना विज्ञानाने शेतीक्षेत्रात किती भरीव प्रगती केली आहे याविषयीचे एक-दोन धडे तरी आम्ही नक्कीच देऊ शकू असा आमचा विश्वास होता. म्हणून आम्ही खते, कीटकनाशके, जादा पीक देणारी बियाणी इ. विषयी माहिती मिळवून व पुसा, टाटाफायझन इ. संस्थांमधून मिळालेल्या माहितीपत्रकांसह सज्ज होऊन खेड्याकडे रवाना झालो. शेतकरी आमचे अगदी खुल्या दिलाने स्वागत करतील याविषयी आम्हाला अजीबात शंका नव्हती. पहिल्या तीनच दिवसांत आमचा भ्रमनिरास झाला. आम्ही ज्या बाबींविषयी जेवढी माहिती देऊ शकत होतो त्या बाबींविषयी शेतकऱ्यांना आमच्यापेक्षा जास्त माहिती होती. याशिवाय हवा-पाण्याचा लहरीपणा, खतांच्या बदलत्या किमती, अयोग्य पुरवठा-व्यवस्था व मालाचा निकृष्ट दर्जा यांविषयीचे त्यांचे ज्ञान आमच्या-पेक्षा किती तरी पटींनी जास्त होते. हा आमचा पहिलाच पराभव होता व विज्ञानावर आम्ही जो गाढ विश्वास ठेवला होता त्याला पहिला धक्का बसला !

## निरीक्षक आणि निरीक्षण

तंत्रज्ञान उपलब्ध असूनही लोक त्याचा उपयोग का करत नव्हते हा प्रश्न आम्ही स्वतःलाच विचारला. मात्र त्या क्षणी हे प्रश्न विचारायला सवड नव्हती. आमचा आत्मविश्वास कायम ठेवण्यासाठी काही तरी करायला पाहिजे होते. बऱ्याच प्रयत्नानंतर आम्ही येथे आलो होतो व काहीच न करता परत जाण्याची आमची तयारी नव्हती. शिवाय अजून चार दिवस शिल्लक होते. रस्त्याच्या कडेलाच नैसर्गिक विधी उरकणारे पुरुष व लोटा घेऊन निघणाऱ्या बायका पाहिल्यावर खेड्याला शौचकूपाची गरज होती हे उघडच होते. अतीव उत्साहाने विटा, सिमेंटचे पत्रे इ. साहित्य जमवून कुणालाही कौतुक वाटेल असा संडास आम्ही बांधला. अपरिहार्य असलेल्या उद्‌घाटनसमारंभानंतर पुढील सुटीत पुन्हा येण्याचे आश्वासन देऊन आम्ही गावकऱ्यांचा निरोप घेतला. पुढील सुटीतील कार्यक्रमासाठी लोकांकडून देणग्या मिळवण्याचा प्रयत्न आम्ही केला नसता तर आम्ही तिथे गेलोही असतो.

आमच्या मित्रमंडळींनी आम्हाला पैसे द्यावेत म्हणून त्यांना आमच्या पूर्वीच्या उपक्रमातून आम्ही काय कार्य केले आहे याची माहिती देणे आवश्यक होते. म्हणून आमच्यापैकी एक जण सार्व-जनिक आरोग्यासाठी आम्ही काय केले हे दाखवणारे फोटो काढण्या-साठी त्या खेड्यात रवाना झाला. तिथून परत आल्यानंतर 'आपल्याला एकही फोटो घेता आला नाही. कारण संडासाचा उपयोग शेळ्या-मेंढ्या बांधण्यासाठी गोठा म्हणून होतो!' असे त्याने सांगितले. हे गावकरी अगदी महामूर्ख असून या जगातील (व कदा-चित स्वर्गातील सुद्धा) कोणतीही शक्ती त्यांना मदत करू शकणार नाही हे आमच्या त्वरित लक्षात आले; पण शांत स्वभावाच्या आमच्या एका सहकाऱ्याने–ज्याला आमच्या शेतीसुधारणेच्या विपुल प्रयत्नांची आठवण होती–निराळा विचार केला. या मूर्खपणाचे आपण कारण शोधू शकतो का ? असा प्रश्न त्याने उपस्थित केला. हा आमच्या कसोटीचा क्षण होता. गावकऱ्यांनी शौचकूपाचा उपयोग न करण्याचे कारण आमच्या लक्षात आले. हे कारण म्हणजे आम्ही स्वतःच होतो. अशी एक सोय आम्ही निर्माण केली ज्याची त्यांना

गरज वाटत नव्हती व शेळ्या-मेंढ्यांना सावली पुरविण्याची त्यांची निकड आम्ही दुर्लक्षिली होती, याचा अर्थ असा की, **विज्ञान म्हणजे केवळ निरीक्षण नव्हे, तर त्यात निरीक्षकाचाही समावेश असला पाहिजे.**

यानंतर आम्ही कारखान्यांकडे वळलो. ग्रामीण भागाविषयी कदाचित आपल्याला ज्ञान नसेल; पण आमच्याजवळ देशात उपलब्ध असणारे अद्यावत तंत्रज्ञान तर आहे व याचा औद्योगिक विकासाला उपयोग होऊ शकेल असे आम्हाला वाटले. लघु उद्योगांसमोर असंख्य तांत्रिक अडचणी असतात, ज्या त्यांना स्वतःला सोडवता येत नाहीतच; पण अनुभवी व पारंगत सल्लाही मिळू शकत नाही असे आम्ही ऐकले होते. ही उणीव भरून काढण्यासाठी आम्ही तंत्रज्ञांचे एक पॅनेल तयार केले. कारखाने, विद्यापीठे व संशोधन-संस्थांशी असणाऱ्या आमच्या संबंधामुळे या तंत्रज्ञांचे ज्ञान व वेळ मोफत उपलब्ध होईल अशी आम्ही व्यवस्था केली व भावी उद्योजक, विकास कार्य करणारे कार्यकर्ते यांना 'तुम्हाला कोणतीही अडचण आली तर कळवा. आम्ही मदत करायला उत्सुक आहोत!' असे सांगितले.

सुरुवातीला आमच्याकडे आलेल्या समस्यांपैकी एका अभियांत्रिकी पदवीधराला प्लॅस्टिक मोल्डिंगचा कारखाना सुरू करण्यासाठी कर्ज हवे होते. आम्ही काही करू शकलो का? आमच्या तज्ज्ञांनी नाक मुरडून असे जाहीर केले की, पैसा हा काही 'तांत्रिक' प्रश्न नाही.

उत्तर प्रदेशातील आदिवासी भागात काम करणाऱ्या विकास-संस्थेने एक समस्या आमच्याकडे सोपविली. त्यांची अडचण साधी होती. खूप प्रयत्न करून ६ इंच व्यास व २५० फूट खोल अशी एक कूपनलिका त्यांनी खोदली होती; पण पाणी लागले नव्हते. कूप-नलिकेच्या तळाशी एक विवर तयार करून त्यात जमिनीतील पाणी साठविणे व त्याची वाफ न होऊ देता पंपाद्वारे त्याचा उपयोग करता येणे शक्य आहे असे त्यांनी ऐकले होते. शेतीसाठी त्यांना ५,००० गॅलन पाण्याची आवश्यकता होती. आमच्या तज्ज्ञमंडळींनी उत्साहाने प्रतिसाद दिला. कारखान्याशी संबंधित अशा एका तज्ज्ञाने सुचवले की, विहीर आणखी खोल म्हणजे ५०० फुटांपर्यंत खणावी. हे खोदकाम करण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री त्याच्या कंपनीकडे असून खर्च फक्त २ लाख रु. येईल. हे करण्यास विकास-संस्था तयार आहे का?

दुसऱ्या एका तज्ज्ञाने हे मान्य केले की या कामासाठी उपयोगी पडणाऱ्या परंपरागत स्फोटक द्रव्याची त्याला माहिती नाही; पण अशा कामासाठी अणुशक्तीवर चालणाऱ्या उपकरणांविषयी काही अमेरिकन निबंध त्याला माहिती आहेत. किरणोत्सर्गाची एक लहा-नशी अडचण यात होतीच; पण त्याच्या प्रयोगशाळेने या क्षेत्रात काही काम केलेले नव्हते. पण यासंबंधी इतर कुणी तरी आम्हाला सल्ला देऊ शकेल अशी आशा त्याने व्यक्त केली. तिसऱ्या तज्ज्ञांनी अगदीच सोपा उपाय सांगितला. ते म्हणाले, "त्यांच्याजवळ २५० फूट खोल असे भोक आहेच व त्यांना ५,००० गॅलन पाणी हवे आहे. साधी आकडेमोड केली तर आहे या खड्ड्यातच यापेक्षा जास्त पाणी साठ-विता येईल, हे लक्षात येईल. मग या विकाससंस्थेला हवे तरी काय?" यानंतर मात्र तज्ज्ञांचे पॅनेल ही काही फारशी चांगली कल्पना नव्हे अशा निर्णयाप्रत आम्ही आलो.

आमचे तज्ज्ञ आम्हाला समस्येची निश्चित व्याख्या विचारत. कारण या व्याख्येमुळे संबंधित समस्या त्यांच्या कक्षेत येते किंवा नाही हे ठरविता आले असते; पण आमच्याकडे जे लोक त्यांच्या अडचणी घेऊन येत त्यांच्यात ही व्याख्या करण्याची क्षमता नव्हती. विज्ञानाचा हा प्रकार जरा गुंतागुंतीचाच होऊ लागला होता. निरी-क्षणाबरोबर निरीक्षकाचा विचार तर करावा लागतच होता; पण या दोन्हींमधील परस्पर संबंधही महत्त्वाचा आहे असे दिसत होते.

## नेमक्या समस्या

यापुढे आम्ही असे ठरविले की, ज्यांना आपल्या समस्येची निश्चित व्याख्या करता येईल व जी समस्या सोडवणे आपल्याला शक्य आहे अशाच समस्यांचा आपण विचार करायचा. १९७२–७३ मधील महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीत अशी संधी आहे असे आम्हाला वाटले. पाऊस पडला नाही, नद्या–नाले आटून गेले, गरिबांची तर अन्नान्नदशा झालीच; पण श्रीमंतांनाही काय करावे हा प्रश्न पडला. याच सुमारास सचिवालयातील कोणत्याही बैठकीत अशी आपत्ती पुन्हा येणार नाही या दिशेने प्रयत्न करण्याचे ठरले. सरकार दुष्काळी कामे तर सुरू करणारच होते; पण उत्पादक कामांवर भर दिला जाणार होता. जेथे शक्य असेल तेथे पाझर तलाव जर तयार केले तर त्यात पावसाचे पाणी साठेल व परिसरातील विहिरी आटणार नाहीत व पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ ही एक इतिहासजमा बाब होईल! पाझर तलावांचे सर्वेक्षण, आखणी व बांधकाम ही कामे आम्हाला करता येतील अशीच होती. दोन महिने पाझर तलावाला योग्य अशा जागा निवडणे, सार्वजनिक बांधकामखात्याच्या विहित पद्धतीनुसार मोजमाप करणे इ. कामे करीत आम्ही उन्हातान्हातून भटकलो. विज्ञानाद्वारे आम्ही नेमके काही करू शकतो असे आम्हाला वाटू लागले. आमचा हा समज आमच्यापैकी एकाने लोकांना होणाऱ्या लाभाच्या संदर्भात आपल्या कामाचे मूल्यमापन करण्याची कल्पना मांडेपर्यंत टिकला. हे काम कठीण नव्हते. कोणती जमीन पाण्याखाली बुडेल, कोणत्या जमिनीला पाण्याचा लाभ मिळेल, कोणती पिके घेतली जातील यासारख्या घटकांच्या संदर्भात संभाव्य लाभांचा विचार करण्यास सुरुवात केली. आम्ही ज्या घटकांचे निरीक्षण केले त्यात एक ठराविक नमुना–पद्धत आहे हे लगेचच आमच्या लक्षात आले. पाण्याखाली बुडणाऱ्या जमिनींचा खूपच मोठा भाग तीन एकरांहून कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांचा होता, तर ज्या विहिरींना पाझर तलावाचा लाभ मिळणार होता त्या श्रीमंत शेतकऱ्यांपैकी एक सरपंच व इतर नेते किंवा अधिकारी मंडळी यांच्या शेतात होत्या.

हे फारच चमत्कारिक होते. विज्ञानाचा लाभ थोड्या लोकांनाच का व्हावा? निरीक्षण व निरीक्षक दोन्हींमधील परस्परसंबंध या–शिवाय काही कारण होते का? प्रश्न महत्त्वाचा वाटल्याने विविध दृष्टिकोनांतून अनेक वेळा विचार करून पाहिला. पाऊस पडला नाही म्हणजे पाण्याची इतकी टंचाई होते की 'पिण्याचा थेंबही नाही.' हे निरीक्षण आमचे म्हणजे निरीक्षकांचे. पाण्याची समस्या व आम्ही यातील आमचा संबंध पाण्याचा शोध घेणे व ज्यांना पाणी हवे आहे

पृष्ठ १७ वर

बगाड (१४)

# वृत्तसृष्टीतली 'लाल' जोडी

बघ्या

'टाइम्स ऑफ इंडिया' या वर्तमानपत्राला जो दर्जा आहे, तो इतर इंग्रजी वर्तमत्रांनी कितीही उरफोड केली तरी त्यांना लाभलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. आपआपल्या आवडीप्रमाणे इंडियन एक्स्प्रेस, स्टेटसमन्, हिंदुस्थान टाइम्स या वर्तमानमानपत्रांची हिरीरीने तारीफ करणारे लोक आढळतात. हिंदू, ट्रिब्यून वगैरे वर्तमानपत्रे समोर असल्याखेरीज सकाळची कॉफी किंवा न्याहरीचा 'प्रान्ठा' होऊ न शकणारे दाक्षिणात्य किंवा पंजाबीही भेटतात. टाइम्सला अशी कोणतीच विशिष्ट चव नाही, कोणत्याही प्रश्नावर कडेची भूमिका घेण्याची त्याला सवय नाही किंवा कोणत्याही वादात अभिनिवेशाने तो उतरलाय असेही घडत नाही. घरात कार्य निघाले असता पोक्तीपुरवती घरधनीण जशी अलिप्तपणे–पण कोरडेपणाने नव्हे–त्यात भाग घेऊन आली जबाबदारी नेटकेपणाने आणि सहजतेने पार पाडीत असते तसा टाइम्स सर्व घडामोडींकडे सुजाण प्रौढपणाने पाहू शकतो.

हल्ली पुण्याला येणारा टाइम्स एक दिवसाचा जुना असतो. महाराष्ट्र टाइम्स त्याच दिवशी पुण्याला येतो; पण इंग्लिश टाइम्सला वयोमानानुरूप घाट चढायला एक सबंध दिवस लागतो! त्यामुळे बहुतेक लोकांनी 'टाइम्स' बंद करून 'एक्स्प्रेस' घ्यायला सुरुवात केली. शिवाय 'एक्स्प्रेस'-मध्ये कोणता चित्रपट पुण्यात कोठे लागला आहे याची यादीही दिलेली असते. त्यामुळे पुण्यातले वर्तमानपत्र घेण्याची गरजही उरत नाही. पुण्याला ताजा टाइम्स येत असे तेव्हा त्याचा पुण्यातला खप काही थोडा नव्हता; पण तरीही पुण्यातल्या चित्रपटांची यादी देण्याचा थिल्लरपणा टाइम्सने कधी केला नाही! मी टाइम्सशी इमान राखून आहे. जुना तर जुना, मी टाइम्सच वाचणार!

वाहवून जाणे टाइम्सच्या स्वभावात नाही. चिनी आक्रमणाच्या काळात बहुतेक सर्व वर्तनानपत्रांचा तोल सुटला. नेहरूंच्या आणि मेननच्या धोरणावर सगळी पत्रे जीव खाऊन लिहीत होती. अमेरिकेशी संरक्षणकरार केला पाहिजे, लष्कर–भरती सक्तीची केली पाहिजे, शाळा–कॉलेजांतून शस्त्रास्त्रांचे शिक्षण दिले पाहिजे; एक दोन ॲटमबॉम्ब भात्यात तयार ठेवावेत अशा अनेक वावडचा सोडून दिल्या जात होत्या; पण टाइम्सच्या नानपोरियांनी मात्र चिनी आक्रमणाचे मर्यादित स्वरूप पहिल्यापासून ओळखले होते आणि त्याच्यावर भर देऊन ते सतत सांगत होते की, चीन आपले आक्रमण अचानक थांबवील आणि आपल्याला गोंधळात पाडील! बासष्टच्या नोव्हेंबरात चिन्यांनी लढाई एकतर्फी थांबवली तेव्हा, मला आठवते, नानपोरियांनी आपल्या नेहमीच्या स्तंभात त्यापूर्वीच्या दोन वर्षांतल्या आपल्या लेखातले उतारे छापून अखेरचा वळसा दिला होता.

### नेटका आढावा

गेल्या पाच वर्षांत आपल्याकडे ७४–७५ सालात गाजलेली बजबजपुरी, लाचलुचपत, नैतिक अवनती, त्यावर उतारा म्हणून झालेली संपूर्ण क्रांतीची चळवळ, श्रीमती गांधींची निवडणूक रद्द ठरल्याने आधीच खदखदत असलेल्या राजकारणाचे उताला जाणे, आणीबाणीची काळरात्र आणि नंतर जनताराजवटीची परवड आणि अगदी अलीकडे निवडणुकींचा अनपेक्षित कौल या घटना इतक्या झपाटचाने घडल्या की, खंदे विचारवंत त्या घटनांचा मागोवा घेता घेता मेटाकुटीला आले. कित्येकांच्या बुद्धीला झीट आली! आणि कित्येक जण प्रत्येक उगवत्या सूर्याला अर्घ्य देण्यासाठी स्वतः-भोवतीच इतके वेळा गरगरा फिरले की, त्यामुळे आलेल्या भोवळीतून ते अजून उठायचे आहेत!

टाइम्सकारही या घटनाचक्राच्या गिरक्यांमुळे गोंधळले नाहीत असे नाही. जनता पक्षाच्या विजयानंतर पहिल्याच अग्रलेखात त्यांनी नेहमीचा संयम सोडून श्रीमती गांधी व संजय गांधी यांच्यावर जहाल टीका केली. बाईंना त्यांनी सरळसरळ हुकुमशहा म्हटलेच; पण संजयवरही 'कॉमिक्स वाचण्यापुरतीच ज्याच्या बुद्धीची कुवत आहे असा पोरकट मनुष्य' असा ताशेरा झाडला; पण हे सर्व त्या एकटचा अद्भुत दिवसापुरतेच की, जेव्हा खुद्द मोरारजींचा साक्षात खळखळून हसणारा फोटो वृत्तपत्रांना शोभवून गेला होता!

त्यानंतर टाइम्स लवकरच आपल्या नेहमीच्या वाटेवर आला. परिस्थितीचा नेटका आढावा घेऊन चपखल निष्कर्ष काढण्याचे काम त्याने सातत्याने केले. कॉंग्रेसचा ७७ सालचा पराभव म्हणजे लोकशाहीचा विजय आणि एकाधिकारशाहीला मूठमाती अशातला काही प्रकार नसून दडपशाही आणि विशेषतः नसबंदीचा जुलूम यांच्याविरुद्ध केलेले एक दिशाहीन बंड असे त्याचे स्वरूप होते, हा टाइम्सचा पहिला निष्कर्ष होता. ८० सालच्या निवडणुकांनी या निष्कर्षाला दुजोरा दिला आहे.

आपला समाज धर्म, जाती, भाषा, हितसंबंध, रीतिरिवाज इत्यादी अनेक कालबाह्य किंवा कालसंबद्ध कारणांनी चिराळलेला आहे. त्यातच आर्थिक विकासाची आच लागल्याने परंपरागत मूल्यव्यवस्थाही कोलमडली आहे. त्यामुळे निष्ठा, मैत्री, तत्त्वे, प्रामाणिकपणा इत्यादी गोष्टींची पर्वा न ठेवता चालत्या क्षणाला आपल्या ताटात पक्वान्न कसे पडेल याची तरतूद करण्यात सर्व क्षेत्रातली पुढारीमंडळी गुंतली आहेत. अशा स्थितीत पक्षबांधणी केवळ वैभूतिक नेतृत्वाला केंद्रस्थानी ठेवूनच होऊ शकते, अन्यथा पक्ष खुरटलेले रहातात. सांसदीय लोकशाहीच्या अस्तित्वासाठी पक्षाची नितांत आवश्यकता आहे. सारांश, विभूतिवाद हा भारतीय लोकशाहीला धोका नसून तोच तिचा साह्यकर्ता आहे असे टाइम्सचे गेल्या काही वर्षातले दुसरे निरीक्षण आहे, तेही चूक आहे असे म्हणता येणार नाही.

### शामलाल आणि गिरिलाल

यानंतर मात्र टाइम्सकार अधिक घसरडचा रस्त्यावरून वाटचाल करायला लागतात. अर्थात येथेही पुरेशी सावधगिरी ते बाळगतात, नाही असे नाही. प्रत्येक बाबत

ते निरनिराळ 'जर–तर' घालून अधिकाधिक संकुचित करतात. प्रत्येक निष्कर्षाला अनेक अपवाद ते सांगतात; परंतु इतकेही करून ते अशा अपरिहार्य तात्पर्याला पोचतात की, सध्याच्या परिस्थितीत असे वैभूतिक नेतृत्व देऊ शकणारी एकच व्यक्ती भारतीय राजकारणात आहे आणि ती म्हणजे श्रीमती गांधी !

आता हा निष्कर्षही सर्वसामान्य जनतेला मान्य आहेच, हे पुन:पुन: प्रत्ययाला आलेले आहे; परंतु समाजात अशी अनेक उच्चस्तरीय मंडळी आहेत, निरनिराळ्या क्षेत्रांत नावारूपाला आलेली विचारवंत माणसे आहेत की, ज्यांना श्रीमती गांधींचे विभूतिमत्त्व मान्य नाही. ही माणसे बाईंना अजूनही हुकुमशहाच मानतात आणि तो सुद्धा देशकल्याणेच्छु हुकुमशहा नव्हे तर स्वार्थी, आपमतलबी आणि नीतिनियम झुगारणारा हुकुमशहा ! टाइम्सकार अशा मंडळींना 'इंटेलिजन्शिया' किंवा विचारवंत म्हणून संबोधतात आणि या लोकांनी बाईंचे नेतृत्व स्वीकारावे, कमीत कमी सद्य स्थितीत या नेतृत्वाला पर्याय नाही इतके तरी मान्य करावे अशी तळमळ त्यांना लागून राहिली आहे.

टाइम्सचे आजी संपादक गिरिलाल जैन आणि माजी संपादक श्यामलाल या दोघांनी गेले वर्षभर बाईंचे नेतृत्व विचारवंतांच्या गळी उतरवण्यासाठी सततची लेखनकामासाठी चालवली आहे. निरनिराळ्या निमित्तांनी ते दोघे आठवड्याला दोन लेख लिहून नाना प्रकारे ही विचारसरणी सजवीत असतात. प्रत्येक लेखानंतर एक-दोन पूर्वाश्रमींची साम्यवादी पत्रे लिहून या दोन लालांची पाठथोपटणी करतात. इन्साइसिव्ह ॲनॅलिसिस, नीट री-कॅपिच्युलेशन ऑफ फॅक्ट्स्, पेनिट्रेटिंग ॲण्ड रिॲलिस्टिक सर्व्हे ऑफ करंट पोलिटिकल सीन अशा शाबासक्यांचा पाऊस या पत्रांतून पडत असतो.

### राजवटीची वैधानिकता

आता यावर कोणी विचारील की, बाईंची निवडणूक काही या मूठभर विचारवंतांवर अवलंबून नाही. त्या स्वत: या विचारवंतांची काही बूज ठेवतात असेही नाही. बरे, या विचारवंतांपाशी इतर काही सामर्थ्य आहे, त्यांचे सामान्य प्रजेवर काही वजन आहे असेही नाही. मग त्यांचा हा अनुनय या दोघा लालांनी कशासाठी चालवला आहे ? भले न का मानेनात हे विचारवंत बाईंचे नेतृत्व त्यांची सत्ता तर तळागाळाच्या जनतेच्या पाठिंब्यावर निर्भर आहेच! याला उत्तर दुहेरी आहे. पहिले असे की या तथाकथित विचारवंतांखेरीज मुळात टाइम्स आणि त्यांतही लालजोडीचे लेख वाचतोच कोण ? तेव्हा विचारवंतांखेरीज दुसऱ्या कोणाला उद्देशून ही लालजोडी लिहूच शकत नाही. हे विचारवंत आणि श्रीमती गांधींचे नेतृत्व यांतील दुरावा स्पष्टच आहे. तेव्हा लिहिण्याला अधिक चांगला विषय कोणता ?

पण दुसरे आणि अधिक महत्त्वाचे कारण असे की, श्रीमती गांधींच्या नेतृत्वाला विचारवंतांच्या मान्यतेची जरुरी नाही हे म्हणणेही बरोबर नाही. निवडणुकांद्वारे सत्तेवर येता येते आणि सत्तेच्या जोरावर वाटेल ते निर्णय अंमलात आणता येतात हे खरे असले तरी बहुसंख्य निर्णय असे असतात की त्यांची परिणामकारकता प्रजेने त्या निर्णयांचा अंत:करणपूर्वक स्वीकार केल्याखेरीज अनुभवास येत नाही. नेतृत्व कितीही विभूतिसंपन्न असले तरी दर क्षणाला आपल्या विभूतिमत्त्वाचा आश्रय करून ते जनतेला 'साकडे घालू शकत नाही. अखेर नेतृत्वाचा विचार आणि सामान्य जनतेचे वर्तन यांची सांगड घालण्यासाठी माध्यमाची आवश्यकता राहणारच. विचारवंतांचा वर्ग हा या माध्यमांवर वर्चस्व असणाऱ्यांचा वर्ग असल्याने विचारवंतांची मान्यता कोणत्याही नेतृत्वाच्या दृष्टीने गरजेची गोष्ट आहे.

आता प्रश्न उरतात दोन. पहिला असा की, विचारवंतांची ही मनधरणी टाइम्सकार आज मोठ्या कौशल्याने करीत असले तरी अशा मनधरणीचा हा पहिलाच प्रयत्न आहे असे नाही. ६९सालच्या कॉंग्रेसच्या फुटीपासून अनेक लोकांनी हे प्रयत्न वारंवार केले आहेत; परंतु त्याचा विचारवंतांवर काहीही परिणाम झाल्याचे आढळत नाही. श्रीमती गांधींच्या नेतृत्वाविषयी विचारवंतांचा हा अविश्वास का ? दुसरा प्रश्न असा की, विचारवंतांची बाईंच्या नेतृत्वाला असलेली गरज जर विचारवंतांच्या प्रसारमाध्यमावर असलेल्या पकडीमुळे असेल तर हे विचारवंत सामान्य जनतेला श्रीमती गांधींपासून दूर का नेऊ शकत नाहीत ? त्यांचा प्रभाव जर असा मर्यादित असेल तर त्यांनी बाईंचे नेतृत्व मानल्याने त्या नेतृत्वाचा असा काय फायदा होणार ?

### अविश्वासाचे मूळ

दुसऱ्या प्रश्नाचा विचार तूर्त तहकूब ठेवून आपण पहिल्या प्रश्नाकडे वळू. प्रश्न असा आहे की, सध्या संसदीय लोकशाहीसाठी वैभूतिक नेतृत्वाची गरज आहे आणि असे विभूतिमत्त्व फक्त श्रीमती गांधींच्या ठिकाणी आहे. असे असताना या नेतृत्वाला विचारवंतांची साथ का मिळत नाही ? याचे एक उत्तर असे की, वैभूतिक नेतृत्वाची गरज असल्याचा लालद्वयाचा शोध प्राप्त परिस्थितीच्या निरीक्षणातून निघालेला आहे; परंतु केवळ परिस्थितिसापेक्ष विचार क्रांतिकारी असत नाही. ७०-८० वर्षांपूर्वीच्या परिस्थितीचा लालजोडीच्या दृष्टीने आढवा घेतला असता तर इंग्रजी राज्य अधिक सुदृढ करण्याची गरज आहे, ते ईश्वरी वरदान आहे असाच निष्कर्ष निघाला असता आणि तसा निष्कर्ष बहुसंख्य विचारवंत काढतहीहोते; परंतु टिळक, गांधी, नेहरू असे आदर्शवादी नेते पुढे आले आणि इंग्रजी राज्याच्या अंताचा ध्यास त्यांनी घेतला आणि आज आपण स्वतंत्र आहोत. तोच प्रकार या विभूतिवादाचा आहे. परिस्थितीचा विचार बाजूला ठेवला तर हे उघड आहे की, विभूतिवाद हा लोकतंत्रविरोधी आहे. मग अडचणींचा बागुलबुवा करून आदर्शाकडे पाठ फिरवणे हे करंटेपणाचे ठरेल. अशा करंटचावृत्तीला विचारवंत बळी पडत नसतील तर ते सुचिन्हच म्हटले पाहिजे.

गांधी आणि नेहरू यांचे नेतृत्वही वैभूतिक होते ; ते अशा अर्थाने की, त्यांच्या विरोधात जाऊन आम जनतेला कौल लावण्याचे धैर्य कोणी करू शकत नव्हता; परंतु म्हणून त्यांचे निर्णय हे एकांगी, आपमतलबी किंवा लहरी असत अशातला भाग नाही. नीतिमूल्ये समाजापुढचे आदर्श आणि प्राप्त परिस्थिती यांच्या संदर्भात नेहरूंच्या निर्णयाचे युक्तिसंगत विश्लेषण करता येत असे. निर्णय विरोधकांना पटत असे असे नाही ; पण तो एकांगी, स्वार्थी किंवा लहरी नाही याची खात्री पटू शके.दुर्दैवाने श्रीमती गांधींच्या अनेक निर्णयांचे असे युक्तिसंगत विवेचन कोणी करू शकलेले नाही. परवाच गिरिलाल जैन यांनी स्वत: नुकत्याच झालेल्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाविषयी हेच म्हटले आहे की, या निर्णयामागची कारणमीमांसा कळणे कठीण आहे.

श्रीमती गांधींविषयी विचारवंतांना वाटणाऱ्या अविश्वासाचे मूळ त्यांचे निर्णय युक्तिसंगत विवेचनाला टिकू शकत नाहीत ह्यात आहे. इतकेच नव्हे तर अशा विवेचनासाठी जी व्यासपीठे लोकशाही राज्यपध्दतीत निर्माण झालेली असतात अशा व्यासपीठांची उपेक्षा त्यांनी सातत्याने केली. आहे. या त्यांच्या वृत्तीत आजही फरक पडला असल्याचे दिसत नाही. अशा स्थितीत लालजोडीची लेखनकाम निष्फळच ठरणार असा रंग दिसतो. □

पश्चिमेकडून बंगलादेशीय परकीय नागरिकांच्या घुसखोरीविरुद्ध आज सारा आसाम पेटून उठला आहे. हा प्रश्न कसा सोडवायचा याचा उलगडा कुणालाच होत नाही. इंदिरा गांधीही हतबल दिसताहेत. अशा वेळीं स्मरण होणे स्वाभाविक आहे सावरकरांचे – ज्यांनी स्वातंत्र्य मिळण्याच्या सुमारासच, म्हणजे तेहतीस वर्षांपूर्वीच इशारा देऊन ठेवला होता की, तसूभर भूमीही यापुढे आक्रमकांना देऊ नका ! **२५ एप्रिल १९४७ ला**, त्या वेळचे आसामचे मुख्यमंत्री गोपीनाथ बार्डोलाय यांना सावरकरांनी एक तार पाठविली होती. या तारेत सावरकरांनी म्हटले होते––

" आक्रमक मुसलमानांशी आपण भेकड वृत्तीने चालविलेल्या तडजोडीचा हिंदूसंघटनवादी जनता ठणठणीतपणे निषेध करीत आहे ... ज्या नव्या वा जुन्या आक्रमकांनी आसामात प्रवेश केला आहे त्या सर्वांची अगदी शेवटच्या माणसापर्यंत हकालपट्टी केलीच पाहिजे ! त्यांना आता एक तसूभरही भूमी देऊ नये !... आसामात घुसलेल्या औरंगजेबी सैन्याला खडे चारणाऱ्या शूर आसामी वीरांच्या आजच्या वंशजांनी लीगच्या बाजारबुणग्यांना कधीही शरण जाऊ नये. अखंड हिंदुस्थानची पूर्वसीमा संरक्षण्याचे आणि वाढविण्याचे पूर्वपरंपरागत कर्तव्य चोखपणे पार पाडण्याचे पवित्र कर्तव्य आसामी हिंदूंनी पार पाडलेच पाहिजे ! "

–हिस्टॉरिकल स्टेटमेंटस् बाय वीर सावरकर, पृष्ठ १९५

तेव्हा नाही तरी आता, ३३ वर्षांनी आसामी जनता हे कर्तव्य पार पाडण्यासाठी पुढे सरसावली आहे. सैन्यानेही माघार घ्यावी असा प्रखर अहिंसात्मक पुरुषार्थ तेथील आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनी प्रकट करून सर्वांनाच चकित करून टाकले आहे. या पुरुषार्थाची कहाणी ' अस्वस्थ आसाम ' या लेखमालेद्वारा ' माणूस ' मधून नुकतीच येऊनही गेलेली आहे. पण आसामची पूर्वसीमाही पश्चिमसीमेसारखीच धोक्यात आहे. पश्चिमसीमेवर पाकिस्तानी-
-बंगलादेशीय घुसखोरांचे संकट
होते-आहे, तर पूर्वेकडून–दक्षिणेकडून डोके वर काढणारे संकट उद्भवले आहे, आपण ख्रिस्तीकरणाकडे डोळेझाक केली म्हणून. धर्मांतर हे या भागात आज राष्ट्रांतर ठरलेले आहे.
या संकटाची ओळख करून देणारी, ' अस्वस्थ आसाम ' या लेखमालेचा जणू उत्तरार्धच अशी ही छोटी लेखमाला ... सुमारे चार अंकात येणारी...

# पूर्वांचलाचे आव्हान

## लेखांक पहिला । विनय सहस्रबुद्धे

गेल्या वर्षीच्या मे महिन्यातली गोष्ट ! विद्यार्थी परिषदेच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांच्या निमंत्रणावरून अरुणाचल प्रदेशातून सुमारे ३० विद्यार्थ्यांची एक तुकडी परिषदेच्याच एका उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्राच्या सुमारे वीस दिवसांच्या दौऱ्यावर आली होती. मुंबई, पुणे, औरंगाबाद इ. बरोबरच कोल्हापूरलाही या विद्यार्थ्यांनी भेट दिली. जवळजवळ सर्वच ठिकाणी सांस्कृतिक देवाण-घेवाणीच्या या उपक्रमाचं स्वागत झालं, विद्यार्थ्यांचे नागरी सत्कार झाले, वृत्तपत्रांनीही चांगली प्रसिद्धी देऊन या उपक्रमाचं कौतुक केलं. अन्य शहरांतल्या वृत्तपत्रांप्रमाणेच कोल्हापूरच्या वृत्तपत्रांनीही या उपक्रमाबद्दल सविस्तर वृत्त दिलं; पण ते देतांना खटकलेली एक गोष्ट म्हणजे त्यातल्या बहुतेकांनी ह्या विद्यार्थ्यांचा ' अरुणाचलमचे विद्यार्थी ' असा उल्लेख केला होता.

गोष्ट म्हटली तर अगदीच मामुली, म्हटली तर महत्त्वाची ! महाराष्ट्रातील एका मोठ्या शहरातील नावाजलेल्या वृत्तपत्रांना भारतातील एका केन्द्रशासित प्रदेशाचं नावही नीटपणे माहीत नसावं ? अरुणाचल प्रदेशाचं 'अरुणाचलम्' करणं हा मुद्रणदोष नक्कीच नाही. ढळढळीतपणे अशा गंभीर चुका सर्रास केल्या जात आहेत आणि त्या फारशा कुणाच्या लक्षातही येत नाहीत ही वरवर वाटते तशी मामुली बाब नाही. तशी ती मामुली वाटत असेल तर ' भारतातील सर्वसामान्य लोक आपल्याजवळ सदैव साप बाळगतात ' अशा समजुतीतून भारताबद्दलचं अज्ञान दर्शविणाऱ्या काही पाश्चात्य नागरिकांची कीव करण्याची गरज नाही.

कोल्हापूरच्या काही वृत्तपत्रांनी केलेली चूक ही एक नमुनेदार घटना आहे. कोल्हापुरातच काय, पण मुंबईतही अशा चुका घडत नाहीत वा घडणारच नाहीत अशातला भाग नाही. आजही अनेक उच्च विद्याविभूषितांना देखील मणिपूर हे राज्य आहे की शहर, शिलाँग नेमक्या कोणत्या प्रांतात आहे हे किंवा अशा प्रकारचे प्रश्न सतावीत असतातच. तेव्हा अरुणाचल प्रदेशाचं ' अरुणाचलम् ' झालं, यात नवलाची बाब नाही. चुकांचं स्वरूप वेगळं असलं तरी कारण एकच आहे. बंगालच्या पुढचा हा त्रिकोणी भूभाग, विशेषतः त्यातली छोटी छोटी अर्धा डझन राज्ये भारताचाच एक भाग आहेत याची जाणीव मुळात अन्य भारतीयांमध्ये फारशी दिसत नाही व तशी ती नसल्यानेच या प्रदेशाच्या समस्या सोडविणे वा त्या समजून घेणे तर दूरच, या प्रदेशाची नुसती ओळख व्हावी असे सुद्धा अनेकांना वाटत नाही. या प्रदेशाच्या इतिहासाला आणि भूगोलाला उर्वरित भारतीयांकडून झालेल्या उपेक्षेची जोड मिळाली; परिणामतः राष्ट्रीय एकात्मतेसाठी भारतासारख्या विस्ताराने मोठ्या अशा देशातील विविध प्रांता–प्रांतात जे एक ' सांस्कृतिक सुसंवादित्व ' आवश्यक असते तेच नाहीसे झाले ! मूळ राष्ट्रीय प्रवाहापासून एकाकी

आणि अलग पडलेल्या या प्रदेशात याचे अनेक परिणाम आज स्पष्टपणे दिसतात. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लष्करी बळाचा वापर करून नव्हे तर उर्वरित भारताबद्दलचा जिव्हाळा किंवा स्वदेशाविषयीची आत्मीयता, ऐक्यभावना, यांच्या जोरावर हा प्रदेश भारतापासून अलग होऊ न देणं हे तुम्हा–आम्हा सर्वांपुढेच एक आव्हान आहे!

हे आव्हान समजून घ्यायचं असेल तर ईशान्य भारतातील आसामव्यतिरिक्त अन्य सहाही प्रांतांचा प्रवास करायला हवा. कारण इथे प्रांतागणिक वेगवेगळ्या समस्या आहेत. दुर्गम प्रदेश आणि त्या मानाने दळण-वळणाची साधने कमी, त्यामुळे मर्यादित वेळेत या सहाही प्रांतांचा प्रवास करणं सोपं नाही. त्यामुळेच काहीशा ढोबळ मानानं या विविध समस्यांचं प्रातिनिधिक स्वरूप जिथे पहायला मिळतं त्या मेघालय व नागभूमी या दोन प्रांतांपुरताच मला आपला दौरा मर्यादित ठेवावा लागला.

¤

गौहाती ते शिलाँग हे सुमारे साडेतीन तासांचं अंतर आहे. हा प्रवास विलक्षण नयनरम्य निसर्गसौंदर्याच्या प्रदेशातून होतो. जवळजवळ हे संपूर्ण अंतर कात्रजचे दहा-पंधरा घाट एकापुढे एक जोडल्यावर तयार होणाऱ्या घाटाघाटाच्या रस्त्यानं कापावं लागतं. सतत साडेतीन तास घनदाट वनराईच्या प्रदेशातून, एकापुढे एक अवघड वळणे घेत आपण शिलाँगमध्ये येऊन पोहोचतो तेव्हा शिलाँगच्या प्रथम दर्शनानंच प्रवासाचा सारा शीण हलका होतो.

## शिलाँगमधील बंगाली

मोठं शहर असूनही शिलाँग वसलं आहे टेकडाळ, उंचसखल भागातच. त्यामुळे शहरातले मोठे रस्तेही वळणावळणाचे आणि चढ-उताराचे आहेत. आसामप्रमाणेच याही भागात कुडाच्या भिंतींना सिमेंटचं पक्कं प्लास्टर केलेली छोटेखानी टुमदार आणि सुबक घरं सर्वत्र दिसतात. या घरांची उतरती छपरं नानाविध रंगांनी सजलेली आहेत. शहरातल्या कुठल्याही उंच टेकडीवरून सभोवार नजर टाकली तर लाल तांबड्या किंवा गर्द हिरव्या आणि तपकिरी छपरांची, छोट्या–मोठ्या वृक्षांच्या सान्निध्यात वसलेली घरं दिसतात आणि रंगांची ती मुक्त उधळण पाहून मन मोहरून उठतं. काळ्या तांबड्या पट्ट्यापट्ट्याच्या नागाशाली पांघरून इकडून तिकडे लगबगीनं हालचाल करणारे पिवळट गोरे खासी स्त्री–पुरुष या सौंदर्यात अधिकच भर घालतात.

शिलाँग ही १९७० पर्यंत अविभक्त आसामची राजधानी होती. १९७२ मध्ये खासी, गारो आणि जयंतीया या तीन टेकड्या मिळून बनलेला सुमारे २२,४८९ चौ. कि. मी. चा प्रदेश वेगळा काढून त्याचं मेघालय हे स्वतंत्र राज्य बनविण्यात आलं. सुमारे पावणेबारा लाख लोकसंख्येच्या या राज्यात, एक शिलाँग सोडलं तर अन्यत्र सर्व आदिवासी जमाती आहेत. राजधानी शिलाँगची लोकसंख्या सव्वालाखाहून अधिक आहे व त्यात पन्नास हजारांच्या आसपास बंगाली आहेत.


सुमारे तीस-चाळीस वर्षांपूर्वी मेघालयात येऊन स्थायिक झालेल्या या बंगाल्यांना परकीय नागरिक ठरवून मेघालयाबाहेर हाकलून देण्यासाठी राज्यातील विरोधी पक्षांनी खासी स्टुडंटस युनियनच्या साहाय्याने मध्यंतरी आंदोलन घडवून आणले होते. वरवर आसामच्या व मेघालयाच्या समस्येत साम्य वाटले तरी प्रत्यक्षात बरेच अंतर आहे. आसामप्रमाणे मेघालयातील बंगाल्यांची संख्या प्रचंड नाही आणि जे सुमारे पाऊणलाख बंगाली मेघालयात राहतात, त्यांतील बहुसंख्य फाळणीपूर्वी वा फाळणीनंतर लगेचच वैधमार्गाने मेघालयात येऊन स्थायिक झाले आहेत. संख्येने कमी असल्यामुळे स्थानिक खासी जमातीच्या लोकांवर वर्चस्व गाजविण्याच्या स्थितीतही आज बंगाली मंडळी नाहीत. त्यामुळे मुळातच ठिसूळ पायावर उभे असलेले खासी विद्यार्थ्यांचे 'परदेशी नागरिकांविरुद्धचे आंदोलन' आसामप्रमाणे जनआंदोलन बनू शकले नाही. त्यामुळेच की काय, सुमारे महिन्याभरापूर्वीच आपण होऊन खासी विद्यार्थ्यांनी हे आंदोलन मागे घेतले. आसामपेक्षाही मेघालयात बंगाल्यांबद्दलचा द्वेष अधिक धारदार आहे व ही द्वेषभावना उत्तरोत्तर वाढतच आहे. आसामात बंगाल्यांबद्दलच्या कडवटपणाला काही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे, बंगाल्यांची वर्चस्ववृत्ती आणि भाषिकवाद इ. समजण्यासारखी कारणे आहेत. मेघालयात मात्र या कडवटपणाला, या द्वेषभावनेला धार्मिक कारणे आहेत. 'ख्रिश्चन स्टेट' बनण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या मेघालयात निम्म्याहून अधिक खासी समाज आज ख्रिश्चन झाला असून आपल्या धर्मगुरूंच्या प्रेरणेनं तमाम हिंदू बंगाल्यांना 'परदेशी' ठरवून मेघालयाबाहेर हाकलून देण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. या प्रयत्नांची दिशा दर्शविणाऱ्या अनेक घटना गेल्या सहा महिन्यांत मेघालयात घडून आल्या, त्यापैकी महत्त्वाच्या घटनांचे ठळक संदर्भ आजही अनेक ठिकाणी दिसतात.

गेल्या २२ ऑक्टोबरला, ऐन विजयादशमीच्याच दिवशी दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे निघणाऱ्या दुर्गामातेच्या मूर्तीच्या विसर्जनाची मिरवणूक निघाली.खासी लोकांच्या वस्तीतून मिरवणूक जात असतानाच अनपेक्षितपणे मिरवणुकीवर दगडफेक सुरू झाली. काहींनी पळ काढला, काहीजण जखमी झाले आणि सर्वाधिक गंभीर बाब म्हणजे दुर्गामातेची मूर्ती भंग पावली आणि हजारो बंगाल्यांच्या भावना दुखावल्या गेल्या. संतप्त बंगाल्यांनी पोलिसस्टेशनांवर निदर्शने केली. शेवटी दोन खासी गुंड युवकांना अटक करण्यात आली.

मेघालयातील या खासी जमातीच्या लोकात दरबार नावाचा एक प्रकार असतो. शहरातील खासी वस्त्यांचे नेतृत्व करणारे शेकडो वृद्ध खासी पुरुष या खासी दरबाराचे सदस्य असतात व त्यामुळेच या दरबाराच्या मागण्यांना व निर्णयाला बरेच महत्त्व देण्यात येते. दंगलीच्या दुसऱ्याच दिवशी दि. २३ ला या खासी दरबारची बैठक झाली.त्यात अटक केलेल्या दोघा गुंड खासी युवकांची त्वरित सुटका करावी अशी जोरदार मागणी करण्यात आली. शिवाय या अटकेच्या विरुद्ध दि. २४ ला शिलाँगमधील लाइतुमखरा या भागातील सर्व Non-tribals लोकांची दुकानं बंद ठेवण्यात यावी असा फतवा देखील खासी श्रेष्ठींच्या दरबाराने काढला.

या फतव्यातील Non-tribals हा शब्द महत्त्वाचा आहे. खासी युवकांच्या अटकेचा निषेध करायचा खासी दरबाराने व दुकाने मात्र Non-tribals लोकांनी बंद ठेवायची हा प्रकार अजब आहे. सरकारी प्रशासनाला समांतर अशा प्रकारे खासी दरबारचं काम चालतं हाच याचा अर्थ आहे!

दि. २४ ऑक्टोबरला शिलाँगमधील सर्व राजकीय पक्षनेत्यांची एक बैठक पार पडली. या बैठकीत श्री. मार्टीन माजॉ आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते श्री. पी. आर. किंडिया यांनी केलेल्या भाषणांचे वृत्तांत थक्क करणारे आहेत. या उभयतांनीही बंगाल्यांना मारहाण करण्याची एकही संधी सोडू नका असा संदेश उघडपणे खासी जमातीला दिला! सर्व बंगाली परकीय आहेत, असं सांगून ते




म्हणाले की, या बंगाल्यांना जर मेघालय सोडून जायचं नसेल तर शिलाँगच्या रस्त्यारस्त्यावर त्यांना मार खावा लागेल !

एवढी प्रक्षोभक भाषणं झाली तरी पोलिसांनी श्री. मार्जा किंवा श्री. किंडिया यांच्यावर कोणतीच परिणामकारक कारवाई केली नाही. परिणामतः या मारहाणीच्या आवाहनाला राजमान्यता मिळाल्यासारखे झाले आणि दि. २५ ला संध्याकाळी 'शिलाँग बंद' संपुष्टात येत असतानाच मोठ्या प्रमाणावर हिंसाचाराला सुरुवात झाली.

दि. २५ च्या संध्याकाळी 'बंद' अधिकृतपणे संपला होता. नित्याच्या व्यवहारासाठी लोक घराबाहेर पडले, पण त्यापैकी अनेकांना हिंसेला बळी पडावं लागलं. 'मोपारिन' या बंगल्यांच्या मोहल्ल्यात पद्धतशीर दगडफेक सुरू झाली. पोलिसांची गस्त सुरू असतानाच खुद्द पोलिसांच्याच गाडीच्या टपावर चढून तीरकामठ्याने बंगाल्यांवर बाण मारण्यात आले. पोटात बाण लागून एका चार वर्षांच्या बंगाली मुलाचा त्यातच मृत्यू झाला. शिलाँगमध्ये गवळ्याचा धंदा करणारे हजारो बंगाली आहेत. गाडीखाना ही त्यांची वस्ती या हिंसाचारातून सुटली नाही. घरमालकांच्या देखत हिंसक जमावानं बंगाल्यांची राहती घरं जाळून टाकली, काही ठिकाणी लुटालुटीचे प्रकारही घडले. या सगळ्याचा परिणाम म्हणजे सुमारे दोन हजार हिंदू बंगाली बेघर झाले ! आज मेघालय सरकारने काही सरकारी शाळां-मधून त्यांच्या राहण्याची तात्पुरती सोय केली आहे. या सर्व घटनांमध्ये अधिकृत माहितीनुसार तीन जण ठार झाले, २८ जखमी झाले तर बंगाल्यांची सुमारे २२५ दुकाने लुटण्यात आली !

बंगाल्यांविषयी खासींच्या मनात ही द्वेषभावना निर्माण होण्या-मागे सामाजिक आणि धार्मिक कारणे आहेत. मुळात खासी किंवा मेघालयातील गारो आणि जयंतीया या अन्य जमातींचे लोकही अतिशय शांत, सुस्वभावी आणि मैत्रीला जागणारे आहेत. असं असूनही बंगाल्यांविषयी हा कडवटपणा कशासाठी ? सर्वसाधारण बंगाली समाज खासी लोकांपेक्षा सर्वच बाबतीत पुढारलेला आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात किंवा फाळणीनंतर लगेचच्या काळात मेघालयात येऊन स्थायिक झालेल्या बंगाल्यांपैकी बहुसंख्य सुशिक्षित आहेत. घरातले कर्ते पुरुष एक तर व्यापारी आहेत, नाही तर बऱ्यापैकी नोकरीवर आहेत. स्वाभाविकच सुशिक्षितपणाबरोबरच बंगाल्यां-कडे सुबत्ताही आली आहे. बंगाल्यांचे व्यापारी कौशल्य म्हणण्या-पेक्षा खासींची व्यापारातील अनभिज्ञता, यामुळे एक बंगाली व एक खासी माणूस यांनी एकाच वेळी एकाच प्रकारचा धंदा सुरू केला तर महिन्याभरात बंगाली चांगला नफा मिळवेल, खासी व्यापारी मात्र दुकान बंद करण्याचा विचार करील ! आसामातील बंगाल्यां-प्रमाणेच खासींना व्यापार-व्यवहार समजत नाही, हा काय आमचा दोष आहे ?' अशा इथल्या बंगाल्यांचाही सवाल आहे.

शिलाँगच्या एका राष्ट्रीकृत बँकेतील अधिकारी श्री. कारिआ खेंगपी, एक खासी व्यापारी श्री. निग्योम संगमा आणि मेघालयाच्या विद्यमान मंत्रिमंडळातील एका मंत्र्याचे वडीलबंधू श्री. भिकनफाम-सिंग यांच्या मते बंगाल्यांनी या ना त्या प्रकारे खासींची पिळवणूक केली आणि त्यामुळे एरवी शांत आणि सुस्वभावी असलेले खासी आज बंगालीद्वेषी बनले आहेत. काही हितसंबंधी लोक या खासी–बंगाली संघर्षाला अकारण ख्रिश्चन–हिंदू संघर्षाचे स्वरूप देत आहेत, असंही त्यांना वाटतं.

या प्रश्नाला केवळ धार्मिक पार्श्वभूमीच आहे असं नसलं तरी आजच्या संघर्षाची मुळे प्रामुख्याने धार्मिक पार्श्वभूमीत आहेत, असं मत व्यक्त करणारेही अनेकजण आहेत. सेंग खासी कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती बत्तियाम तिमथाई, माजी मुख्यमंत्री श्री. डार्विन प्यू यांचे वडील श्री. बी. एम. प्यू शिलाँग टाइम्सचे संपादक श्री. मानस चौधरी इ. अनेकांनी खासी–बंगाली संघर्षामागे ख्रिश्चन धर्मगुरूंचा हात असल्याचं मत व्यक्त केलं आणि आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ अनेक कारणंही दिली.

## ख्रिश्चनांच्या हालचाली

या भागात ख्रिश्चन धर्मगुरूंच्या हालचाली सतत वाढतच आहेत. स्वाभाविकच नाना प्रलोभनांना बळी पडून धर्मांतरित झालेल्यांची संख्याही उत्तरोत्तर वाढत गेली आहे. खासी, गारो आणि जयंतीया या टेकड्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या आणि टेकड्यांच्याच नावाने ओळखल्या जाणाऱ्या या तिन्ही जमातीत तीन वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. या तिन्ही भाषांचे स्वरूप मागासलेपणामुळे सामान्यतः बोलीभाषेचेच राहिल्यामुळे यापैकी एकाही भाषेला स्वतःची स्वतंत्र लिपी नाही. टेकडीतील प्रदेशात एके काळी अत्यंत मागासलेलं जिणं जगणाऱ्या लोकांच्या या प्रदेशात अन्य धर्मांच्या प्रचारकांपेक्षा सर्वांत आधी पोचलेल्या हुशार ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ती गोष्ट जाणली. खासींना वश करायचं असेल तर त्यांची आर्थिक दैन्यावस्था दूर केली पाहिजे, त्यासाठी त्यांना आधुनिक जगात आणलं पाहिजे, हेही ख्रिश्चनांनी ओळखलं. त्याची पहिली पायरी म्हणून ख्रिश्चनांनी खासी भाषेला रोमन लिपी दिली. ख्रिस्ताच्या गोष्टी आणि गाणी खासी भाषेतून सामान्य खासी जनतेपर्यंत पोहोचविण्याचं एक माध्यम यामुळे ख्रिश्चनांच्या हाती लागलं. भोळ्या-भाबड्या खासींनी सुशिक्षित बनण्यासाठी रोमन लिपी स्वीकारली आणि इथपासूनच त्यांच्या ख्रिश्चनीकरणास सुरुवात झाला. 'तुम्ही आमची लिपी स्वीकारलीत, म्हणजे तुम्ही इंग्लिश झालात, म्हणजे आपोआपच तुम्ही आकाशातल्या बापाची लेकरे झालात' असा ख्रिस्ती धर्मगुरूंचा युक्तिवाद खासींच्या मनावर वारंवार ठसला गेला आणि गिरिकुहरातून वावरणारे निसर्गपूजक खासी सहजासहजी गिरिजाघरांकडे आकर्षित झाले.

खासी-ख्रिश्चनसंबंधाविषयी श्री. जयंतभूषण भट्टाचारजी यांनी लिहिलेल्या एका पुस्तकात म्हटल्याप्रमाणे १९२५ नंतर ख्रिश्चनांचं काम प्रचंड प्रमाणावर सुरू झालं हे खरंच; पण या कामाची सुरुवात १८१० मध्येच झाली होती, सेरामपूर मिशनचा एक मिशनरी रेव्ह. पॉल यांनी १८१३ पर्यंत खासी–जयंतीया या टेकडाळ प्रदेशाचा नीट अभ्यास करून खासी भाषेला रोमन लिपी देण्याची कल्पना अंमलात आणली आणि अवघ्या दहा-पंधरा वर्षांत बायबल व न्यूटेस्टामेंट या ख्रिस्ती धर्मग्रंथांचा खासी भाषेत अनुवादही करून घेतला ! याच पुस्तकात म्हटल्याप्रमाणे १८४१ मध्ये मेघालयात आलेला एक वेल्श मिशनरी थॉमस जोन्स याच्याकडे तत्कालीन ब्रिटिश शासनाने संपूर्ण चेरापुंजी जिल्ह्यात ख्रिस्ती मिशनरी शाळांचा प्रसार करण्याचे काम सोपविले होते. या काळात खासी जमातीचा एक नेता श्री. उ लाई थाट याने स्वतः बंगाली भाषा शिकून आपल्या बांधवांना बंगाली लिहिण्या वाचण्यास शिकवायला सुरुवात केली होती; पण जोन्सच्या हाती शिक्षणखाते एकवटल्यावर लाईथाटच्या शाळा बंद पडल्या आणि बंगालीचा मागमूसही राहू नये, बंगालीविषयी द्वेष निर्माण व्हावा व त्या जागी रोमन लिपीचे स्वागत व्हावे असे यशस्वी प्रयत्न सुरू झाले.

याच काळात ख्रिश्चन शाळांचा प्रसार झाला आणि ब्रिटिश सरकारने सर्व विद्यार्थ्यांना शाळेत पाठविणे पालकांवर बंधनकारक केल्याने ख्रिस्ती करण्याची प्रक्रिया वेगाने होऊ लागली.

ख्रिश्चनांच्या या शिक्षणाद्वारे धर्मप्रचाराच्या मोहिमेस, मागासलेपणास कंटाळलेल्या खासींनी भरघोस प्रतिसाद दिला. आजही मेघालयातील एकूण ख्रिश्चनांच्या संख्येत पूर्वीचे खासी सर्वाधिक आहेत. खासींपाठोपाठ जयंतीया जमातीला वश करण्याचे ख्रिश्चनांचे प्रयत्न सुरूच होते; पण ख्रिश्चनांना केवळ आपल्या सुशिक्षित होण्यातच रस आहे असं नाही तर त्यांना जयंतीयांच्या मूळ धर्माच्या जागी येशू ख्रिस्ताचा धर्म आणायचा आहे हे चाणाक्ष जयंतीया नेत्यांनी ओळखले. परिणामतः ख्रिश्चनांचे जाळे नीट पसरले जाण्यापूर्वीच १८६०–६४ या काळात जयंतीया यांनी ख्रिश्चनांशी सशस्त्र संघर्ष केला. मागासलेले जयंतीया आणि शस्त्र–सुसज्ज ख्रिश्चन यांच्यातील हा लढा केवळ विषम होता व त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. 'जयंतियांचे बंड' या नावाने ओळखला जाणारा हा लढा ख्रिश्चनांनी अक्षरशः दडपून टाकला. जयंतीयांच्या या लढ्यापासून स्फूर्ती घेऊन पुढे बाबू जीवनरॉय या खासी पुढाऱ्याने खासींचे स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी १८९० मध्ये सेंग खासी चळवळीची स्थापना केली.

या सेंग खासी चळवळीविषयी सविस्तर विवेचन पुढच्या लेखांकात येईलच, तूर्त खासींचा मूळ धर्म कोणता ? या प्रश्नाच्या संद-

र्भात सेंग खासी चळवळीची प्राथमिक माहिती घ्यायला हवी.

सेंग खासोचा संस्थापक बाबू जीवनरॉय खासी जमातीत जन्मलेला पहिला शासकीय अधिकारी होता. जीवनरॉय यांचे वडील कलकत्त्यात एक व्यापारी होते व त्यांचे सर्वच कुटुंब बऱ्यापैकी सुशिक्षित होते, जीवनरॉय यांनी तरुण वयातच हिंदू धर्माचा सखोल अभ्यास केला. महाभारत व रामायणही वाचून काढले. आपल्या मूळ खासी जमातीतील रीतिरिवाजांचे हिंदू चालीरीतींशी असलेले साम्य पाहून श्री. जीवनरॉय यांनी शिलाँग व भोवतालच्या प्रदेशात ठिकठिकाणी विविध देवदेवतांची मंदिरे बांधली. श्री. रॉय यांनी ब्राह्मो समाजाचंही काही काळ काम केलं. आपल्या नव्या ज्ञानामुळे हिंदू आणि खासी परंपरांबद्दल जीवनरॉय अभिमानी बनले. 'रोमन लिपी स्वीकारल्याने खासी आपोआपच ख्रिचन बनतात.' या मिशनऱ्यांच्या प्रचारातील फसवणूक त्यांनी आपल्या ज्ञातिबांधवांसमोर आणली. खासी ही हिंदू धर्माची एक शाखा आहे ही वस्तुस्थिती त्यांनी सर्वप्रथम प्रकाशात आणली आणि आपल्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपून ठेवण्यासाठी ख्रिश्चनांपासून सावध राहण्याचा सल्ला दिला.

जीवनरॉय यांनी सुरू केलेली ही सेंग खासी चळवळ पुढे काहीशी निष्प्रभ का ठरली हे पहाण्यापूर्वी ख्रिश्चनांच्या वाढत्या प्रभावाचा बंगाली-खासी संघर्षाशी असलेला संबंध तपासून पाहयला हवा.

### मेघालयाची निर्मिती

ख्रिश्चनांचं काम आज सबंध मेघालयात किती प्रचंड प्रमाणावर वाढलं आहे हे समजून घेताना काही आकडेवारी उपयुक्त ठरेल. ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या गौहाती-शिलाँग विभागात कॅथॉलिक, इव्हांजलिस्ट, व बाप्टिस्ट या तिन्ही पंथांचे धर्मगुरु कार्यरत असून एकटया कॅथॉलिक धर्मांतरितांची संख्या सुमारे १ लाख १४ हजार आहे. निव्वळ कॅथॉलिकांचे एकूण ८७ धर्मप्रचारक या भागात धर्मप्रसार करीत आहेत व त्यांच्या मदतीला ३३८ धर्मबंधु आणि धर्मभगिनी प्रचारक म्हणून काम करीत आहेत. या भागात एकूण ५ हॉस्टेल्स, १ हॉस्पिटल, ५१४ प्राथमिक शाळा, २१ माध्यमिक शाळा, ३ महाविद्यालये आणि ५ तंत्रविज्ञानविद्यालये एवढा कॅथॉलिक मिशनचा प्रचंड पसारा आहे.

कॅथॉलिक मिशनचा पसारा एवढ्या प्रचंडपणे वाढू शकला याचं कारण नानाविध प्रलोभनांना बळी पडून ख्रिस्ती धर्म स्वीकारलेले खासी व अन्य जमातीचे लोक! आजमितीस सुमारे चार लाख लोकसंख्येच्या खासी जमातीतील अडीच लाखांहून अधिक खासींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे. जयंतीया व गारो या अन्य दोन जमातींमध्येही एकूण लोकसंख्येच्या ४० टक्केहून अधिकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे. परिणामतः आज राजकीय सत्तेसह अन्य सर्व सत्ताकेन्द्रे पूर्णपणे ख्रिश्चनांच्या ताब्यात आहेत. फार काय पण स्वतंत्र मेघालय राज्याची निर्मिती हा सुद्धा ख्रिश्चनांच्या दूरगामी योजनेचाच एक भाग होता. पूर्वीच्या आसाम राज्यातील खासी, गारो व जयंतीया या तीन टेकड्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या या तीन जमातींच्या सांस्कृतिक स्वातंत्र्याच्या जपणुकीसाठी मेघालय हे नवं राज्य निर्मिण्यात आलं असं आज अधिकृतपणे सांगितलं जातं; परंतु या स्वतंत्र राज्याच्या निर्मितीमागे भारतीय संस्कृतीशी अधिक संलग्न अशा आसामपासून, मागासलेले आणि भारतीय सांस्कृतिक परंपरेची पुसटशीही जाणीव नसलेले व त्यामुळेच सहजगत्या ख्रिश्चन बनू शकणारे खासी व अन्य जमातीचे लोक वेगळे काढावेत व ख्रिस्ती धर्माचा प्रचार निर्वेधपणे सुरू करावा हेच मेघालयनिर्मितीमागचं खरं कारण आहे. आसामच्या विभाजनाच्या या मागणीला केंद्रीय वा राज्यस्तरावरही फारसा विरोध झाला नाही. मेघालयातील तिन्ही आदिवासी जमातींबद्दल आसामात फारशी प्रेमाची, आपुलकीची भावना कधीच दिसली नव्हती. त्यामुळे मेघालयाच्या निर्मितीची फारशी खंत असमियांना वाटली नाही. इतकंच नव्हे तर शिलाँग ही निसर्गसुंदर राजधानी मेघालयाच्या वाट्याला येत आहे याबद्दलही असमियांनी तक्रार केली नाही. केंद्रानंही या मागणीला विरोध केला नाही. मेघालयाच्या निर्मितीच्या वेळी खुद्द पंतप्रधान इंदिरा गांधी हजर राहिल्या आणि ख्रिस्ती परंपरेनुसार चर्चमधल्या घंटा वाजवून त्यांनी 'मेघालया' चा जन्म साजरा केला! ह्या सगळ्या प्रकरणातील Irony म्हणजे 'खासी' च्या सांस्कृतिक स्वातंत्र्याच्या जपणुकीसाठी स्थापन झालेल्या या मेघालयाच्या निर्मितीनंतर सरकार-दरबारी सर्वत्र ख्रिश्चनांचं राज्य झालं आणि खासींची मूळ सांस्कृतिक स्वतंत्रता अधिकच धोक्यात आली!


## तीन राजहंस प्रकाशने

## आणि ड्रॅगन जागा झाला

**लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये**

## मॅक्झिम गॉर्की

**लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : दहा रुपये**

## पूर्णिया

**लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

आतापर्यंत मेघालयात तीन मंत्रिमंडळे येऊन गेली व या तिन्हींचे मुख्यमंत्री ख्रिश्चन होते. विद्यमान मुख्यमंत्री बी. बी. लिंगडो यांच्या मंत्रिमंडळातही एक-दोन अपवाद वगळता सर्व मंत्री ख्रिश्चनच आहेत. सबंध शिक्षणखात्यावर ख्रिश्चनांचं उघड वर्चस्व असून धर्मांतराला नकार देणाऱ्या सेंग खासी जमातीच्या सेंग खासी महाविद्यालयाला अन्य महाविद्यालयांप्रमाणे सरकारी अनुदान मिळत नाही !

## मुख्यमंत्री लिंगडो

मेघालयातील अलीकडच्या खासी–बंगाली संघर्षातील सरकारी बाजू समजून घेण्यासाठी मुख्यमंत्री श्री. लिंगडो यांची मुद्दाम भेट घेतली. मेघालयाच्या सचिवालयातलं दृश्य आपल्या सचिवालयापेक्षा खूपच वेगळं वाटलं ! मुळात राज्य छोटं व त्यामानानं मंत्र्यांची संख्या जास्त. त्यामुळं की काय पण मंत्र्यांना भेटायला येणाऱ्यांची गर्दी अजिबातच आढळली नाही. खुद्द मुख्यमंत्री सुद्धा काही फारसे घाईगर्दीत नव्हते. फेब्रुवारीतही या भागात विलक्षण कडाक्याची थंडी असते. त्यामुळे प्रत्येक मंत्र्याच्या खोलीत वातावरणात ऊब आणण्यासाठी विजेच्या शेगडया बसविलेल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या अशाच उबदार दिवाणखान्यात खुर्चीवर रेलून, तोंडात तांबूल चघळत पिवळसर गोऱ्या वर्णाच्या आणि बुटक्या अंगचणीच्या लिंगडो-साहेबांनी आमच्याशी मनमोकळचा गप्पा मारल्या.

सुरुवातीसच श्री. लिंगाडो यांनी खासी–बंगाली संघर्षामागे धार्मिक कारणे असल्याचा स्पष्टपणे इन्कार केला. या सर्व घटनेला अतिशय ' किरकोळ ' मानून तिचं गांभीर्य व त्यामुळे त्याबाबतची चर्चाही कमी करण्याचा श्री. लिंगडो यांचा प्रयत्न स्पष्टपणे जाणवत होता.

' त्या घटनेला फार महत्त्व देऊ नका!' असं सुरुवातीलाच सांगून श्री. लिंगाडे म्हणाले की, गेल्या ऑक्टोबरमधील घटना खूपच आश्चर्यजनक आहेत. त्यांच्या मते चार-दोन ' अजाण ' आणि ' निष्पाप ' खासी ' बालकांनी ' बंगाल्यांच्या दुर्गापूजेतील मूर्तीवर ' गंमत ' म्हणून दगड मारले व त्यामुळे बंगाली चिडल्याने नंतरच्या सर्व घटना घडून आल्या. ' इतक्या क्षुल्लक प्रकाराने अकारण चिडून जाऊन बंगाल्यांनी या प्रकारावर वादळ उठविण्याची गरज नव्हती.' असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, ' खरं म्हणजे मूर्तीवर दगड फेकल्याने बंगाल्यांच्या भावना दुखावल्या जाण्याचं काहीच कारण नाही.' अखेर दुर्गेची मूर्ती विसर्जनालाच चालली होती, मग तिथे पावित्र्य वा भक्तीच्या भावनांचा संबंध येतोच कुठे ? '

मुख्यमंत्री श्री. लिंगडो यांना ही अजब आणि भयानक तर्कटे लढवून खासी-बंगाली संघर्षाला धार्मिक स्वरूप नसल्याचं भासवायचं आहे, हे उघड आहे. श्री. लिंगडो ख्रिस्ती संस्कारात वाढल्यामुळे गणपतीची किंवा दुर्गेची मूर्ती केवळ विसर्जनासाठी नेतानाच नव्हे तर विसर्जनानंतरही त्या मूर्तीशी हिंदू मनाच्या भावना किती निगडित असतात याची त्यांना कल्पना नसेल किंवा ती नसल्याचं ते नाटक करीत असतील. काहीही असो, खासी–बंगाली संघर्षाला ' किरकोळ ' भासविण्याचा त्यांचा प्रयत्न पटण्यासारखा नाही. हा संघर्षाच्या सुरुवातीचा प्रकार श्री. लिंगडो म्हणतात त्याप्रमाणे 'पोरखेळाचा भाग' मानला तरी त्यानंतर शिलाँग बंदच्या दिवशी ख्रिश्चन खासींनी हिंदू बंगाल्यांवर केलेल्या अत्याचारांची कारणे उलगडत नाहीत. तेव्हा या सर्व प्रकारामागे खासींच्या मनातील बंगाल्यांविषयीच्या किंचित द्वेषाचा फायदा घेऊन ख्रिश्चन खासींनी हिंदू बंगाल्यांवर अत्याचार करण्याची पद्धतशीर योजना आखली होती, हे उघड आहे.

मेघालयातील अलीकडचा खासी–बंगाली संघर्ष, ख्रिश्चनांचा वाढता व्याप आणि खासी–बंगाली संघर्षाकडे पाहण्याचा राज्यसरकारचा दृष्टिकोन इ. मुद्दे या पहिल्या लेखांकांत आले आहेत. ख्रिश्चनांच्या अलीकडच्या काही कारवाया आणि खासींच्या ख्रिस्तीकरणाच्या विरोधात उभी राहिलेली सेंग खासी चळवळ याविषयी सविस्तर विवेचन पुढील अंकात.

( क्रमशः )




लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# विज्ञान म्हणजे काय ?

पृष्ठ ८ वरून

त्यांना ते पुरवणे इतकाच. उलट उपलब्ध केलेले पाणी काही ठराविक श्रीमंतांनाच मिळते हा घटक विचारात घेतला तर 'आम्ही' निरीक्षक पाण्याचा पुरवठा करणे एवढ्याशीच संबंधित न राहाता, ज्यांना पाण्याची गरज आहे ते कोण आहेत याच्याशीही संबंधित होतो. म्हणजे इथे 'आम्ही'त एक गुणात्मक बदल व्हावा लागतो. इथे आम्ही स्वत: जरी गरीब नसलो तरी गरिबांच्या प्रश्नाकडे पहाताना केवळ पाणीपुरवठ्याच्या संदर्भात विचार न करता त्यांचे श्रीमंतांशी असलेले संबंधही विचार घेतो. याचा अर्थ असा आहे का, की जे निरीक्षण करतात त्यांच्यात व ज्यांचे निरीक्षण केले जाते त्यातही भिन्न भिन्न गट असतात. इथे आमच्याऐवजी इतर कुणी निरीक्षक असते तर त्यांचे निरीक्षण वेगळे झाले असते का ? विशेषत: असा निरीक्षक जर स्वतःच या समस्येशी संबंधित असला तर काय होईल ?

## परस्पर विरोधी गट

मध्यप्रदेशातील एका कागदकारखान्याची आम्हाला माहिती मिळाली की या कारखान्यामुळे जलप्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रदूषित पाण्याचे रासायनिक व भौतिक पृथक्करण करणारे अनेक शास्त्रीय अहवाल आम्ही वाचले व प्रदूषणाचे प्रमाण भारतीय मानकसंस्थेने ठरविलेल्या प्रमाणित मर्यादेपेक्षा जास्त होते हे स्पष्ट झाले. वैज्ञानिक म्हणून आमचे काम प्रदूषणाला कारणीभूत असणारे तांत्रिक घटक कोणते याचा अभ्यास करून प्रदूषणाचे प्रमाण कमी कसे करता येईल यासंबंधी उपाय सुचविणे असे होते; पण इतर तंत्रज्ञांनी यापूर्वी या प्रश्नाचा या दृष्टिकोणातून अभ्यास करूनही पाणी प्रदूषित होणे चालूच आहे हे पाहिल्यावर पुन्हा असाच प्रयत्न करणे निष्फळ ठरणार नाही का ? जर आम्ही ज्यांना प्रदूषणाचे परिणाम सहन करावे लागतात अशा लोकांच्या दृष्टिकोणातून या समस्येचा विचार केला तर ही समस्या सोडविण्याचा एक नवीन मार्ग उपलब्ध होऊ शकेल का? असा विचार करून आम्ही आमचे काम सुरू केले. प्रदूषित पाणी पिऊन तुमची गुरे मरतात का? या पाण्याचा परिणाम होऊन दुभत्या जनावरांचे दूध कमी होते का? नदी ओलांडावी लागते त्यामुळे पायांवर काही दुष्परिणाम होतो का ? पाण्यातील माशांवर प्रदूषणाचा काही परिणाम झाला आहे का ? असे प्रश्न विचारत आम्ही प्रदूषणाचा अभ्यास केला. तुलना करण्यासाठी प्रदूषणमुक्त खेडीही निवडली. निष्कर्ष स्पष्ट होते. प्रदूषणमुक्त खेड्यांच्या तुलनेत प्रदूषणग्रस्त खेड्यात जनावरे मरण्याचे प्रमाण १४१ टक्के जास्त होते, तर दुभत्या जनावरांचे दूध २९ टक्के इतक्या प्रमाणात कमी झाले होते. माणसांच्या पायावरील चर्मरोगाचे प्रमाण वाढले होते. २० कि. मी. इतक्या अंतरापर्यन्त नदीतील मासे नाहीसे झाले होते. या निष्कर्षांसह आम्ही प्रथम प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे गेलो. त्यांनी या निष्कर्षांच्या विश्वासार्हतेबद्दल शंका प्रगट केली. खेड्यांतील लोक उगीचच आरडाओरडा करतात असे आम्हास ऐकवण्यात आले. आमचा अहवाल 'अवैज्ञानिक' आहे हे ऐकून आम्हाला आश्चर्यच वाटले. नंतर आम्ही कागदकारखान्याकडे गेलो. "तुम्ही काळजी करू नका. समस्या अगदीच क्षुल्लक आहे. दोन राष्ट्रीय प्रयोगशाळा या समस्येचा अभ्यास करत आहेत व आम्ही लवकरच पुरेपूर उपाय योजू. जनावरे व माणसे यांवर विपरीत परिणाम होणार नाही अशी व्यवस्था सध्याच केलेली आहे. पाण्याचा फक्त रंग बदलला आहे व आम्ही एवढे उपाय योजूनसुद्धा लोक उगाच आरडाओरडा करत आहेत." या उत्तराने समाधान न होऊन आम्ही प्रदूषणनियंत्रण अधिकाऱ्यांकडे गेलो. त्यांनी "तुमच्यासारख्या तरुण व सेवाभावी मुलांचे आम्हाला कौतुक वाटते. तुमच्यासारखेच सर्व तरुण असते तर भारताचे भवितव्य उज्जवल झाले असते; पण दुर्दैवाने..." वगैरे प्रवचन आम्हाला ऐकवले. शेवटी आम्ही गावकऱ्यांकडे गेलो. त्यांनी "होय हो, पण तुमच्या अहवालात आम्हाला नवीन काहीच नाही. ही माहिती आम्हीच तर तुम्हाला दिली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी जर तुम्हाला काही करता येत नसेल तर उगाच आमचा वेळ वाया का घालवता ?" या शब्दात परखडपणे प्रतिक्रिया व्यक्त केली.

म्हणजे निरीक्षक व निरीक्षण यांच्यात विभिन्न प्रकारच असतात असे नव्हे तर या प्रकारातील फरकांमुळे त्यांच्यात विरोध निर्माण होतो असे दिसते. या भिन्न गटांमध्ये जणू काही संघर्ष चालला आहे. विज्ञानातच असे काही अंतर्भूत होते का ज्यामुळे हा संघर्ष उत्पन्न झाला ? विज्ञान हे माणसा–माणसातील क्षुद्र संघर्षापासून अलिप्त व वरच्या पातळीवर आहे असे आम्ही समजत होतो. प्रत्येकजण स्वतःच्या लाभाचा विचार करून विज्ञानाकडे विशिष्ट नजरेने पहातो का ? एका प्रकारच्या विज्ञानाचा उपयोग श्रीमंती वाढविण्यासाठी व गरिबी निर्माण करण्यासाठी होऊ शकतो का ? विज्ञान हे गरिबांना अधिक गरीब बनविण्याचे एक साधन म्हणून वापरले जाते का ? आम्ही शाळाकॉलेजांतून शिकलेल्या सुंदर व व्यवस्थित तत्त्वांचे मग काय होते ?

गरिबांना फायदेशीर ठरू शकेल असे दुसऱ्या प्रकारचे विज्ञान असू शकते का ? या प्रश्नाचा शोध घेण्याचे आम्ही ठरवले. एक विभाग निवडून त्या भागाची सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक-दृष्टया पहाणी केली. जेथे संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे तेथे विज्ञानाच्या मदतीने संघर्ष नाहीसा करता येतो का यावर आम्ही भर दिला. गावातील वाया जाणाऱ्या सांडपाण्याचा उपयोग गरिबांची शेते भिजवण्यासाठी करता येईल का याचा आम्ही अभ्यास केला. मजूर वापरत असलेल्या अवजारांची पहाणी करून त्यांचे काम हलके होऊ शकेल का याचा विचार केला. गरिबांना गरिबीत खितपत ठेवण्यासाठी जी व्यवस्था जबाबदार आहे त्याविरुद्ध लढण्यासाठी गरिबांना कशा प्रकारे संघटित केले असता नवा मार्ग निघू शकेल यासंबंधी त्यांच्याशी विचारविनिमय केला. आमचे विज्ञानाचे शिक्षण समस्या सोडविण्याची पद्धत दाखवू शकते असे आम्हाला वाटे. प्रथम समस्येचे स्वरूप निश्चित करायचे; नंतर या समस्येमागील कारणपरंपरा शोधणे व ते कारण दूर करण्याचा उपाय शोधणे या पद्धतीने समस्यांची सोडवणूक होऊ शकते असा आमचा विश्वास होता.

## नवीन फावडे ...

आम्ही एक नवीन फावडे तयार केले ज्यामुळे जास्त माती उचलली जाऊन काम लवकर होईल व मजुरीही जास्त मिळेल. गावातील सांडपाणी गरिबांच्या शेतापर्यंत कसे नेता येईल याचीही एक निश्चित योजना बनविली. आम्ही असा विचार केला की, जर गरिबांनी या उपाययोजनांमधील त्यांचे संभाव्य फायदे लक्षात घेतले तर ते सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन सांडपाणी वापरण्याचा प्रयत्न करतील आणि नवीन फावड्याचा उपयोग करून जास्त मजुरी मिळवतील. थोडक्यात स्वतः पुढाकार घेऊन स्वतःच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतील.

पण विज्ञानावर आमचा आता तेवढा विश्वास राहिला नसल्याने आम्ही जरा गोंधळलेल्या मनःस्थितीतच गरिबांना भेटलो. कदाचित आमच्या या गोंधळलेल्या अवस्थेमुळेच त्यांची प्रतिक्रिया काहीशी ताठरपणाची झाली असावी. शेतांपर्यन्त पाणी नेऊन आमचा कितीसा फायदा होणार? नवीन फावडे वापरून जास्त कामाबद्दल मजुरी तेवढीच मिळाली किंवा अत्यल्प प्रमाणात वाढ झाली तर काय उपयोग? आमच्या उपायांनी त्यांचे प्रश्न सुटतील असे आम्हाला का वाटते?

आम्हाला प्रथमच हे जाणवले की आमच्या (वैज्ञानिक) पद्धतीचा फारसा उपयोग होत नाहीये. आम्ही ज्या समस्या ओळखल्या त्यांच्याशी निगडीत अशा इतर समस्या आहेत, ज्या कदाचित इतरांना ओळखता येतील. आमचे उपाय वरवरच्या निरीक्षणावर आधारल्याने, मूलभूत समस्यांची ओळख न पटता, वास्तविकतेशी संबंध तुटल्याने कुचकामाचे ठरत असतील. आम्हाला जर वास्तविक परिस्थितीच्या अज्ञानामुळे प्रश्नांची परिणामकारक उत्तरे सापडत नाहीत तर स्वतः गरिबांना–ज्यांना समस्या माहिती आहेत–उत्तरे का मिळत नाहीत?

या प्रश्नांच्या संदर्भात आम्ही आमच्या अनुभवांवर नव्याने विचार करायला सुरुवात केली. शहरातील व खेड्यातील लोकांना जागरूक करण्याविषयीच्या आमच्या अनुभवापासून काय धडा घेता येईल? निरनिराळ्या ठिकाणी जी परिस्थिती आम्ही पाहिली त्यामागे काही समान कारणे आढळतात का? ही समान कारणे त्यांच्या –ज्यांना या समस्यांना तोंड द्यावे लागते–दृष्टिकोनातून तपासली पाहिजेत. कारण विज्ञानात केवळ निरीक्षणाचाच समावेश नसून निरनिराळे निरीक्षक त्यांच्या हितसंबंधांच्या संदर्भात एकाच विशिष्ट घटनेकडे निरनिराळ्या व परस्परविरोधी दृष्टिकोनांतून पहातात हे आपल्याला माहीत आहे.

चर्चा, विचार व फेरविचार यातून एक गोष्ट आम्हाला जाणवली. आम्ही ज्या विशिष्ट प्रकरणांचा विचार केला–शौचकूप बांधलेले खेडे, कूपनलिकेची समस्या, प्रदूषणाचा दुष्परिणाम भोगणारे लोक इ. त्यात लोक स्वतःहून आपल्या समस्या सोडविण्यास तयार होत नाहीत, त्याची कारणे असू शकतात. पहिले भोवतालच्या परिस्थितीतील निरनिराळ्या घटकांतील परस्परसंबंध व कारणपरंपरा त्यांना अशा रीतीने जाणवते की ज्यामधून ही समस्या सुटणे अशक्य आहे असे त्यांना वाटते. समस्येचे दुसरे मूलभूत कारण काही दैवी शक्तीशी संबंधित आहे असा त्यांचा विश्वास. ही दोन्ही कारणे परस्पर संबद्ध अशीच आहेत.

ज्या माणसांनी शौचकूपात शेळ्या बांधल्या त्यांना शौचकूपातील कुंडी व शौचविधी यातील साहचर्य जाणवले नाही. मात्र शौचकूपावरील छत व जनावरांची गरज यांच्यातील परस्पर संबंध त्वरित लक्षात आला. काही तरी अज्ञात कारणामुळे या (शहरातल्या) तरुण लोकांनी आपल्या गावी येऊन हे छप्पर बांधून दिल्याबद्दल त्यांनी दैवी शक्तीचे आभार मानले असतील! उत्तर प्रदेशातील विकास संस्थेने प्राविण्यावरील विश्वास व तज्ज्ञ लोक काय म्हणत आहेत ते न कळणे, यात साहचर्य शोधले व तज्ज्ञांनाही आपल्या समस्येचे उत्तर माहिती नाही, तेव्हा ते परमेश्वरालाच माहिती असेल असे मानून वाया गेलेला खर्च अक्कलखाती जमा केला असणार! तर मजुरांनी जास्त काम व कमी मजुरी यातील संबंध गृहीत धरला व त्याच वेळी मजुरीत वाढ होणे अशक्य आहे असे मानले. एका अर्थाने प्रश्न आता सुटणार नाहीत असे मानून त्यांनी प्रश्न सोडवून टाकला होता! हा सिद्धान्त आम्हालाही लागू होता. आम्ही सुधारित अवजारांचा संबंध जास्त मजुरीशी जोडला व आमची दैवी शक्ती होती विज्ञान!

## हे असे का?

हा आमचा सिद्धान्त जर बरोबर असेल तर यातून मार्ग कोणता? ही दैवी शक्तीची अडचण दूर कशी करता येईल? हा सिद्धान्त आम्हालाही लागू असल्याने आम्ही आमचा अनुभव तपासला. नवीन नवीन अनुभव गाठीशी बांधत विज्ञानाच्या 'दैवी' शक्तीबाबत आम्ही शंका घेऊ लागलो. प्रत्येक वेळी, आमच्या विशिष्ट कृतीचे उद्दिष्ट निश्चित करून, काय होईल याचा अंदाज घेऊन व प्रत्यक्षात काय घडले त्याची तुलना करून प्रत्येक वेळी हे असे का हा प्रश्न आम्ही उपस्थित केला. प्रत्येक वेळी 'हे असे का?' हा प्रश्न उपस्थित करण्याच्या प्रक्रियेतून शाळा–कॉलेजांतून जे विज्ञान आम्हाला शिकवले जाते, त्यासमोरील खरी आव्हाने आमच्या लक्षात आली. ही पद्धत जर बरोबर आणि परिणामकारक असेल–ही पद्धत आम्ही पुनः पुन्हा पडताळून पहात आहोतच–तर लोक ही पद्धत स्वीकारतील का? ग्यानबाची मेख इथेच आहे! लोक जर हे स्वीकारणार नसतील तर 'हे असे का?' हा प्रश्न इथेही उपस्थित होतो.

अकरा वर्षांचा काळ या इतक्या साध्या निष्कर्षाप्रत यायला खूपच जास्त झाला. हेच प्रश्न जर आम्ही दहा वर्षांपूर्वी स्वतःला विचारले असते तर कदाचित अकरा दिवसांत आम्ही या निष्कर्षावर आलो असतोच. या लेखाचे उद्दिष्ट हेच आहे. शाळा–कॉलेजांतून शिकविण्यात येणाऱ्या विज्ञानाच्या स्वरूपाविषयी शंका निर्माण होणे व विज्ञान ही परिस्थिती समजावून घेण्याची एक पद्धत आहे, हे लक्षात येण्यासाठी इतरांना इतका प्रदीर्घ काळ लागणे आवश्यक नाही. विज्ञान म्हणजे प्रश्नाचे समाधानकारकरीत्या उत्तर मिळेपर्यंत 'हे असे का?' हा प्रश्न विचारणे. तुम्हाला हे पटले तर तुम्हीही 'हे असे का' हा प्रश्न विचाराल. आम्ही काय म्हणत आहोत हे तुम्हाला समजले नाही तरी 'असे का?' हा प्रश्न तुम्ही विचारालच. तुम्ही जर याच्याशी सहमत असाल तर मात्र 'असे का?' हा प्रश्न विचारण्याची पाळी आमची असेल. □

[ 'A search for the meaning of science' या सायन्स टू डे ऑक्टो. १९७९ मधील लेखाचा अनुवाद. ]

# पुस्तके

श्रीपाद जोशी

# कथा एका शायराची

मध्यंतरी मराठीत ऐतिहासिक कादंबऱ्यांचा जणू महापूर आला होता; परंतु त्यामध्ये साहित्यिक गुणांनी युक्त व इतिहासाशी इमान राखणाऱ्या दर्जेदार कादंबऱ्या हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढ्याच होत्या. ज्यांना 'क्लासिकल' म्हणता येतील अशा अधिकांश ऐतिहासिक कादंबऱ्या प्रकाशित करण्याचा मान पुण्याच्या कॉंटिनेंटल प्रकाशनालाच द्यावा लागेल. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनी एका अर्थाने या क्षेत्रातील मानदंडच प्रस्थापित केला आहे, असे म्हणता येईल. याचे श्रेय अर्थातच लेखकांबरोबर कॉंटिनेंटलच्या संचालकांनाही द्यावे लागेल. कारण आज असला हा माल खपतो आहे म्हणून त्यांनी कसलाही गाळसाळ वाचकांच्या माथी मारला नाही !

आणखी एका बाबतीत कॉंटिनेंटलचे कौतुक करावेसे वाटते. अमच्या ऐतिहासिक कादंबऱ्या म्हणजे जणू भूत–पूजेचाच एक प्रकार असतो. तथाकथित हिंदुत्वाचे गौरवगान करण्यातच त्या कादंबरीकारांना कृतार्थता वाटते. याच्या उलट कॉंटिनेंटलने भारतीय संस्कृतीच्या विकासाला हातभार लावणाऱ्या किंवा भारताच्या इतिहासाने बरीवाईट पण महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्या अन्य धर्मीय व्यक्तींच्या जीवनांशी संबंधित कादंबऱ्याही प्रकाशित केल्या आहेत. 'शहेनशहा' (औरंगजेब) 'बदनसीब' (बहादुरशाह जफर) व 'कथा एका शायराची' (गालिब) या तीन उत्कृष्ट कादंबऱ्यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. धर्मनिरपेक्षता व राष्ट्रीय एकात्मता यांच्या वारेमाप गप्पा मारणाऱ्या आमच्या राजकारण्यांनी व बुद्धिवंतांनी ही धर्मनिरपेक्षता व राष्ट्रीय एकात्मता सुदृढ बनविण्यासाठी एक प्रकाशनसंस्था केवढे मोलाचे काम करून राहिली आहे, याची जरा सवडीने माहिती घेतल्यास त्यांचा नक्कीच फायदा होईल.

### पारदर्शी जीवनाचा आरसा

'कथा एका शायराची' ही उर्दूतील एक अत्यंत लोकप्रिय कवी मिर्झा अबदुल्ला खॉं गालिब याची अत्यंत पारदर्शी व मुलायम अशी जीवनगाथा आहे. त्याच्या जीवनावरील सिनेमा, 'शायरे आझम' हे श्री. विद्याधर गोखले यांनी लिहिलेले त्याचे आटोपशीर चरित्र व आमच्यासारख्यांनी वेळोवेळी त्याच्यावर लिहिलेले लेख अथवा उद्धृत केलेले त्याचे शेर यांमुळे गालिब हा मराठी वाचकांना जणू आपलाच वाटू लागला आहे. श्रीमती इंदुमती शेवडे यांनी त्याच्या जीवनावर कादंबरी लिहून एकूण मराठी माणसाला त्याच्याविषयी वाटणारा आपलेपणाच व्यक्त केला आहे, असे म्हणता येईल. या कादंबरीसाठी इंदुमतीबाईंनी खूपच परिश्रम घेतले असले पाहिजेत हे स्पष्ट दिसते. त्यांनी इतिहासाशी कोठेही बेइमानी किंवा लपवाछपवी केलेली नाही ! आणि इतके असूनही कादंबरी अत्यंत वाचनीय, वाचकाला कायम खिळवून ठेवणारी झाली आहे. त्यांच्या या अद्भुत यशाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदनच केले पाहिजे !

### कवि–सम्राटाची दुःखे

गालिब हा काही उर्दूतील एकमेव सर्वश्रेष्ठ कवी अथवा शायरे आझम–महाकवीही नव्हे. आधुनिक काळातील इकबाल, जोश, चकबस्त वगैरे कवींसमोर किंवा जुन्या काळातील मीर, दर्द, सौदा वगैरे गझलगो (गझल लिहिणाऱ्या) शायरांसमोर तो टिकाव धरू शकत नाही. तरीही त्याची भाषा, भाव, शैली या साऱ्यांमुळे तो आजही अत्यंत लोकप्रिय आहे आणि त्याची लोकप्रियता अशा प्रकारची आहे की, ती कधीच कमी होणार नाही असे वाटते. अशा या गझलसम्राटाचे जीवन सुरुवातीपासून अखेरपर्यंत अडचणी, दुःखे, अपयशे यांनी काठोकाठ भरून, व्यापून राहिले आहे आणि या साऱ्या दुःखांना, अपयशांना तो तर मुळीच जबाबदार नाही. नियतीने त्याच्या जन्मकाळी त्याच्या सुखावर ठेवलेला निखारा कधी विझलाच नाही ! उलट सतत फुलतच राहिला आणि त्या यातनांच्या आगीतच गालीब सतत होरपळत राहिला ! तरीही त्याने धीर सोडला नाही की आपल्या 'जिंदा दिली' ला रजा दिली नाही. शेवटपर्यंत तो हसतमुख राहिला. आपल्यावर

अन्याय होत असताना इतरांवर स्नेहाचा वर्षाव करीत राहिला. अनेकदा वाकला, अनेकदा मोडला; पण माणुसकीला कधी पारखा झाला नाही. हिंदू, मुसलमान हा भेदभाव त्याच्या मनातच नसल्याने त्याच्या जीवनात सर्वांना प्रेमाचे, मानाचे स्थान होते. भारतीय संस्कृतीची एकात्मता त्याच्या जीवनात जणू साकार बनली होती. गालिब या कवीपेक्षा गालिब हा माणूस फार–फार थोर होता. त्याचे हे थोरपण टिपण्यात इंदुमतीबाईंनी कमालीचे यश मिळविले आहे.

## काही उणीवा किंवा दोष

अशा या सर्व दृष्टींनी अत्यंत काव्यात्म व प्रसन्न असलेल्या कादंबरीत काही उणीवा असतील अशी सामान्य वाचकाला कल्पनाही येणार नाही. परंतु गालिबच्या जीवनाशी व काव्याशी अधिक परिचित असणाऱ्या या उणीवा अवश्य खटकतील. पहिली उणीव अशी की गालिबच्या उर्दू काव्याचा जाता-जाता परिचय करून देण्याची संधी लेखिकेने दवडली आहे. त्या त्या प्रसंगी तिने गालिबचे शेर क्वचित उद्धृत केले आहेत, हे खरे; परंतु त्यांनी गालिबच्या प्रतिभेची किंवा काव्याची साधी झलकही वाचकाला अनुभवायास मिळत नाही. गालिबच्या निवडक आठ–दहा गझलांचा समावेश या कादंबरीत सहज करता आला असता.

बहुधा कादंबरीत मुस्लिम वातावरण निर्माण करण्यासाठी लेखिकेने असंख्य अरबी फारसी शब्दांचा वापर अगदी मुक्त हस्ताने केला आहे. त्यांचे अर्थ कोठेच दिले नसल्याने अशिक्षित माणसाच्या कानांवरून इंग्रजीचे शब्द जसे कसलाही परिणाम न करता निघून जातात, तसे हे शब्द वाचकाच्या नजरेतून सुटून जातील, असे वाटते. त्यात पुन: (बहुधा उर्दू न जाणणाऱ्या व्यक्तीने मुद्रिते तपासल्यामुळे) काही शब्द अशुद्ध स्वरूपात छापले गेल्याने अर्थाचा अनर्थ किंवा निरर्थ झाला आहे. उदाहरणार्थ, 'मलिकु-इशारा' (मिलिकुश्शुअरा-कविसम्राट), आलिम (अलिम–विद्वान), मिटमार (मिस्मार उध्वस्त) वगैरे. 'मलिका' (सम्राज्ञी) ऐवजी 'मालिक' आणि 'काफिर' ऐवजी 'फकीर' यांसारखे घोटाळेही बरेच झाल्याने मुळात कोणता शब्द असेल याचीच शंका येते. 'तालमीसाठी' (म्हणजे शिक्षणासाठी) आणि 'पुढच्या हप्त्यात' (म्हणजे पुढच्या आठवड्यात) यांसारखे गमतीदार-बहुधा खास नागपुरी-प्रयोगही सामान्य वाचकाला चक्रावून सोडतील. पुस्तकाच्या शेवटी कठीण शब्दांचे अर्थ देऊन व उर्दू जाणकाराकडून मुद्रिते तपासून घेऊन हे दोष सहज दूर करता आले असते. काही दोष लेखिकेच्या उर्दूच्या अज्ञानामुळेही झाले असावेत. उदाहरणार्थ 'कनीज' या शब्दाचा अर्थ दासी, मोलकरीण असा आहे; परंतु या कादंबरीतील पुरुषमंडळी तो सर्रास स्वतःला उद्देशून वापरतात. बहुधा लेखिकेला 'नाचीज' (तुच्छ) हा शब्द अभिप्रेत असावा. ' 'या इथं तशरीफ आणावी' यासारखी धेडगुजरी वाक्ये वापरण्याऐवजी शुद्ध उर्दू वाक्ये वापरली असती तर वाचकांना ती अधिक समजली असती. 'दोनशे शेर रचले; पण दिवाण निघाला नाही.' (पृ.४०) असा उल्लेख गालिबच्या रोजनिशीत असल्याचे लेखिकेने म्हटले आहे. दिवाण म्हणजे कवितासंग्रह. तो तयार व्हायचा तर किमान दहा–पाच हजार शेर तरी हवेत. दोनशे शेरांनी दहा-पंधरा पानेही भरणार नाहीत !


## उर्दूत अनुवाद झाला पाहिजे

अशा काही गमतीदार चुका या कादंबरीत झाल्या असल्या तरी त्यांच्यामुळे तिच्या भव्यतेला मुळीच उणेपणा येत नाही. गालिब-वरील सिनेमामुळे तो एक रंगेल, चंगी-भंगी, व्यसनासक्त कवी असल्याची समजूत होते. वस्तुत: तो रसिक वृत्तीचा व उमद्या मनाचा थोर कवी होता. आपल्या स्वभावाशी मुळीच मेळ न राखणाऱ्या सामान्य बुद्धीच्या पत्नीशी त्याने किती निष्ठेने संसार केला ते पाहिले की, त्याच्याबद्दल आदरच निर्माण होतो. तो मद्यपान करीत असे आणि नमाज पढत नसे याबद्दल त्याच्या विरुद्ध खूप काहूर उठले; परंतु तो कधी झिंगून पडला नाही की देवा-धर्माची त्याने टिंगलटवाळीही केली नाही. आपल्या माणुसकीच्या धर्माला तो शेवट-पर्यंत बांधील राहिला. हे सारे चित्र या कादंबरीतून उत्कृष्टपणे साकार होते. गालिब-विषयी उर्दूमध्ये आजवर पुष्कळ साहित्य प्रसिद्ध झाले आहे; परंतु माझ्या माहिती-प्रमाणे, अशा प्रकारे त्याचे भव्योदात्त जीवन चित्रित करणारी कादंबरी उर्दूमध्ये अद्यापि आलेली नाही ! उर्दूच्या वाचकांना आपल्या लाडक्या कविराजासंबंधीची ही सरस व सुरस कादंबरी वाचावयास मिळाली तर ते निश्चितच आवडेल. महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीसारख्या संस्थेने हे काम केल्यास उर्दूचे वाचक तिला दुवा दिल्याशिवाय राहाणार नाहीत.

आजच्या महागाईच्या काळात इतका उत्कृष्ट कागद व मोहक छपाई असलेली ही देखणी कादंबरी एवढ्या अल्प किमतीत दिल्याबद्दल मराठी वाचकही प्रकाशकांना धन्यवाद देतील, यात शंका नाही.

◘

**कथा एका शायराची**
लेखिका : इंदुमती शेवडे
प्रकाशक : कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे ३०
पृष्ठे : ३७४
किंमत : पंचवीस रुपये



फिनिक्स निवड

# Montgomery Clift-

(Biography)

By Patricia Bosworth

(Bantam Books.
Pages 433. $ 2·25)

आतापर्यंत इंग्रजी नटनटयांची इतकी चरित्रे व आत्मचरित्रे निघाली आहेत व इतकी निघत आहेत की, आपल्या भारतीय नटनटयांवर इतकी कमी पुस्तके का निघतात हा विचार डोकावल्याशिवाय राहात नाही. आमच्याकडे डॉरीस डे, व्हिव्हियन ले, रिचर्ड बर्टन, हेपबर्न, एरॉल फ्लीन, सोफिया लॉरेन, मेरिलिन मन्रो, शो बिझनेस लेड बेअर, हॉलीवुड, सिनात्रा, गॅरी कूपर, शर्ले मॅक्लिन, लीव्ह इलमन, जॉन वेन, हेडी लामार, बॉब होप, पीटर उस्तिनॉव्ह, मार्लिन डीट्रिच, ॲन्थनी क्वीन, चार्ली चॅपलिन, हम्फ्रे बोगार्ट, जॉन क्रॉफर्ड, ख्रिस्तियाना क्रॉफर्ड वगैरे अनेक नटांची चरित्रे व आत्मचरित्रे आहेत. याउलट भारतीय नटनटयांपैकी बलराज सहानी, मीना कुमारी, देव आनंद, हंसा वाडकर, स्नेहप्रभा प्रधान, राजकुमार, सुलोचना, राजकपूर, फाळके, राम नगरकर व इतर काही बोटांवर मोजण्याइतकी मोजकीच चरित्रे किंवा आत्मचरित्रे आहेत. नं. २ चा पैसा बाथरूममध्ये होता का कसे वगैरे अनेक किश्श्यांनी त्यांची पुस्तके रंगवता येतील. अलीकडे ghost–writing सुद्धा the in–thing समजली जाते. हॉलीवुडच्या कितीतरी नटनटयांची आत्मचरित्रे 'भूतांनी' लिहिली आहेत.

एखादा धूमकेतू आकाशातून सळकन् जावा तसा मॉंटगोमेरी क्लिफ्ट हॉलिवुडच्या रुपेरी पडद्यावरून गेला. जसा एकाएकी आला तसाच एकदम लोप पावला. पॅसीआनो, डी–नीरो, निकोलसन, जेम्स डीन व मार्लोन ब्रॅंडो यांच्या आधीच मॉण्टी रुपेरी पडद्यावर होता. 'रेड रीव्हर' व 'द सर्च' (१९४८) या चित्रपटाद्वारे तो एकदम प्रकाशझोतात आला व त्याने पुढील नटनटयांसाठी एक वेगळाच पायंडा घातला. अभिनयाचे संकेतच बदलून टाकले. बोलताना तो स्क्रिप्टमधून बोलत आहे असे वाटतच नसे. प्रत्येक भूमिकेत तो सविकल्प समाधी घेत असे. एकदा आचार्य अत्रे म्हणाले होते की, इंद्रियांच्या बंधनामुळे आपल्याला सर्व ठिकाणी आणि सर्व अनुभवातून संचार करता येत नाही म्हणून प्रतिभेच्या पंखांवर बसून आपणाला प्रवास करावा लागतो. याचेच नाव सविकल्प समाधी. असली समाधी घेताना नटनटयांवर ताण येतो की नाही त्याची मला कल्पना नाही; पण बऱ्याच वेळा सविकल्प समाधी घेतल्यानंतर स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात थोडासा तरी बदल घडून येतो की नाही हा एक अभ्यासाचा विषय ठरू शकेल.

मॉण्टीला कोणत्याच बाबतीत गृहीत धरून चालत नव्हते. तो कधी कुठे आणि केव्हा झुकेल याचा बिलकूल नेम नव्हता. एखादी हायटेन्शन वायर मूळ जागेवरून निखळून पडावी तसा तो शेवटी गेला. तो Unpredictable होता. जवळजवळ दशकापर्यंत तो हॉलिवुड निर्मात्यांचा नं. १ चा मागणीचा माणूस होता. त्यानंतर मात्र नियतीची चक्रे गरगरा फिरायला लागली व हॉलिवुडच्या इतिहासातील सर्वांत लांबच लांब व प्रदीर्घ आत्महत्येला सुरुवात झाली. पिऊन पिऊन, मादक औषधे घेऊन व काही अनाकलनीय कारणांमुळे दुःखाला नेहमीचा सोबती करून त्याने स्वतःचे आयुष्य व झळकणारे करिअर त्याखाली चिरडून टाकले. १९६६ मध्ये जेव्हा तो निवर्तला तेव्हा तो फक्त ४५ वर्षांचा होता; पण याआधीच बऱ्याच लोकांनी व त्याने स्वतः कित्येक वेळा त्याच्या दफनक्रियेत भाग घेतला होता.

पॅट्रीशिया बोसवर्थने मॉण्टीच्या कुटुंबाचे सहकार्य घेऊन त्याच्या आयुष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे व तिच्या पुस्तकात वाचकाला खिळवून ठेवणारी वर्णने व माहिती आहे. एका डोंगरामागे जसे आणखीन बरेच डोंगर असतात तसेच काही व्यक्तींच्यामागे समस्यांची रांगच रांग लागलेली असते. मॉण्टी जन्माला येण्यापूर्वीच त्याच्या समस्या निर्माण व्हायला लागल्या. त्याची आई ही एक अनाथ मुलगी होती. ती मोठी झाली पोलादाच्या कारखान्यात काम करणाऱ्या, पिणाऱ्या लोकांबरोबर. अठरा वर्षांची असतानाच ती प्रसूत झाली तेव्हा डॉक्टरने तिला सांगितले, "तू अमेरिकेतील दोन मोठ्या कुटुंबातला वंशज आहेस!" पूर्वजांची नावेही त्यांनी सांगितली. मेरीलॅंडचे ब्लेअर्स व व्हर्जिनियाचे ॲन्डर्सन्स. मॉण्टीच्या आजीने मॉण्टीच्या आईला दत्तक दिले होते व केव्हा तरी माझ्या मुलीला घेऊन जाईन असे दत्तक घेणाऱ्याला सांगितले होते; पण आपल्या मुलीला न्यायला आजी परत आलीच नाही व मॉण्टीच्या आईचे सारे आयुष्य तिचो वंशावळ शोधण्यात गेले !

जेव्हा मॉण्टीच्या आईला (सनीला) स्वतःची मुले झाली तेव्हा आपल्या पूर्वीच्या आयुष्याचा सूड म्हणून तिने ही मुले राजकीय वनवाश्यासारखी वाढवली. सनीचा नवरा तिची प्रत्येक इच्छा पुरी करत असे. मॉण्टीची आई मुलाला घरीच शिकवण्या ठेवीत असे व मुलाला इतर कुणाबरोबरही मिसळू देत नसे.

अभिनय किंवा ढोंग करण्याची क्षमता मॉण्टीच्या अंगी १२ व्या वर्षीच दिसू लागली. त्याचा चेहराही देखणा होता. १३ व्या वर्षापासूनच तो ब्रॉडवेमध्ये अभिनय करायला लागला. MGM चा बॉस एल्. बी. मेयर याला मॉण्टीने एकदा खडसावले होते, "काय पण तुमच्या स्क्रिप्टस् आहेत ! अगदीच भिक्कार ! या अपमानामुळे M.G.M. चा बॉस रडला होता ! त्या वेळी नटांना निर्मात्याबरोबर सात सात वर्षांचे करार

करायला लागत असत; पण आपल्या बाबतीत मॉण्टी निर्मात्याला तसली कोणतीच अट घालू देत नसे! Demand and Supply!

A place In The Sun व From Here to Eternity या १९५० मधील चित्रपटात त्याला आवडत्या भूमिका मिळाल्या. नंतर नंतर क्लिफ्टला फक्त एकच प्रतिस्पर्धी होता. मार्लोन ब्रांडो. मार्लोन ब्रांडो त्या हिप्पी-बिटनिकपूर्व काळात आउटसाइडरच होता. द यंग लायन्समध्ये मार्लोन ब्रांडो याची नाझी अधिकाऱ्याची भूमिका आहे. तो सुचवतो की, त्याच्या मरणाच्या दृश्यात त्याने टेकडीवरून घरंगळून पडावे व शेवटी येशू ख्रिस्तासारखे हात पसरून निपचित पडावे.". त्याने जर असे केले तर मी या चित्रपटात काम करणार नाही! "I will not allow him to steal the show!" मॉण्टी म्हणाला. शेवटी डीन मार्टीन मार्लोन ब्राण्डोला डोक्यात गोळी घालतो असाच सीन निर्मात्याला घ्यावा लागला!

क्लिफ्ट व ब्रांडो यांची जीवघेणी स्पर्धा नेहमी चालू असे; पण मॉण्टी जेव्हा आजारी पडला तेव्हा ब्रांडोला कसेसेच वाटले. 'मॉण्टी, तू मला सारखा चॅलेंज करतोस म्हणून माझा अभिनय सुधारत आहे. तुझी स्पर्धाच नसेल तर माझ्या कामात आत्मसंतुष्टता येईल. ये मॉण्टी, परत अभिनय करायला, मला चॅलेंज द्यायला ये!"

पण मॉण्टी कसा येणार? १९५० च्या पुढे त्याची घसरगुंडी सुरू झाली. त्या वेळेला त्याची कीर्ती व अभिनय शिगेला पोचली होती. मादक द्रव्ये व बाटली यांनी त्याचा पुरा बळी घेतला! पुढे १९५६ मध्ये अल्बेर कामू टाइप अपघात झाला. कामूसारखा मोटारअपघातात तो खलास झाला नाही; पण अभिनय करायला त्याच्या चेहऱ्यावरचे स्नायूच हलेनात! घसरगुंडीला आणखीनच गती मिळाली आणि १९६६ मध्ये रुपेरी हॉलीवूडच्या पडद्यावरील एक उमदा नट स्मृतींच्या पडद्याआड नेहमीसाठी गेला!

बोसवर्थचे पुस्तक वाचनीय असले तरी मॉण्टीच्या अधःपाताचा वेध घेण्यात लेखिकेला फारसे यश आले नाही. मॉण्टी समसंभोगवादी होता म्हणून त्याच्या मनात सारख्या अपराधीपणाच्या भावना येत असत असे लेखिका म्हणते. काही अंशी हे खरे असले तरी ते मुख्य कारण असेल असे वाटत नाही. एक तर पाश्चात्य देशात समलिंगी संभोगाचे प्रमाण बरेच वाढले आहे आणि दुसरे म्हणजे कोणत्याही तज्ज्ञ मानसशास्त्रज्ञाकडून मॉण्टीला ट्रीटमेंट घेता आली असती. Psychosexual development होत असताना एक वेळ (विशेषत: कौमार्यावस्थेत) अशी येते की, सर्वांना Homosexuality विषयी आकर्षण वाटू लागते; पण सामान्यत: पुढची heterosexual stage आपोआप येते; परंतु काही व्यक्ती त्यांच्या गतआयुष्यातील घटनांमुळे त्या स्टेजच्या बाहेर येऊच शकत नाहीत. Homosexuality is a development arrest, and not a perversion असे मानसशास्त्रांचे मत आहे. Psychosexuality चा प्रवास फ्रॉइडच्या म्हणल्याप्रमाणे अर्भकाच्या ओठाचा स्पर्श आईच्या स्तनाला होतो तेथपासून ते टप्प्याटप्प्याने वयात येईपर्यंत चालू असतो. काहींच्या मते तो प्रदीर्घ प्रवास आयुष्यभर चालू असतो. ही भ्रमंती अतिशय भयावह, खाचखळग्यांनी भरलेली असते व तिथे चुकणाऱ्या वाटसरूला समाजाकडून कोणत्याच प्रकारची मदत मिळत नाही. उलट अवहेलनाच होते. शेवटी अपराधीपणाची भावना समाज हा रोवत असतो. कारण समाजाला त्याज्य तो गुन्हा; परन्तु सामाजिक इतिहासच असा आहे की बऱ्याचशा गोष्टी ज्या आज त्याज्य असतात त्या उद्या मान्य असतात. तांत्रिक पंथीय म्हणतील की मॉण्टीसारख्या लोकांची कुंडलिनीच अधिक जागृत बनते. मानसशास्त्रज्ञ म्हणतील की त्याच्या अधःपाताचे बीज बाल्यावस्थेतच पेरले गेले. 'कलाकाराची प्रबळ डेथविश' असे आणखीन काही म्हणतील, तर इतर काही 'विनाश काले विपरीत बुद्धी'चा वाद घालतील, 'काळ आला की निमित्त मात्र लागतं,' असेही एक सोपे विधान मॉण्टीच्या बाबतीत करता येईल. ज्योतिषलोक त्याच्या ग्रहांना दोष देतील व वास्तववादी लोक, 'अहो, धवधवीत यशच पेलले नाही!' असे स्पष्टीकरण करतील. कदाचित या सर्वांत थोडे थोडे सत्य असेल; पण अर्धसत्याने कधी समाधानकारक उत्तर मिळते का? अशा बाबतीत शेवटी एक भले मोठे प्रश्नचिन्हच!

आपल्यामागेही लोक आपल्या नशिबाप्रमाणे व त्यांच्या कुवतीप्रमाणे असेच काही बोलतील व शेवटी ते त्यांचे शब्द व आपण सर्व काळाच्या संथ प्रवाहात हा हा म्हणता विरघळून जाऊ!

जन पळभर म्हणतील हाय हाय...!

**—जे. एन्. पोंडा**

---


**NEW TITLES RECEIVED**

| | | |
|---|---|---|
| 1. | Star Jrek ( Science fiction – Picture Story ) : Gene Roddenberry | Rs. 21/75 |
| 2. | My Misadventures in Filmland ( Celluluid Memoirs ) – Janki Dass | 60/— |
| 3. | Foundation And Empire ( Science fiction ) Isaac Asimor | 13/80 |
| 4. | Death of A Howker ( Mystery ) – Janwillem Van de Wetering | 15/65 |
| 5. | The London Switch – Pulsar Series 1 : Robin Moore & Al Dempsey | 15/25 |
| 6. | The Zodiac Killer ( Crime Story based on actual San Diege murders ) Jerry Weissman | 13/60 |
| 7. | Experiment ( Horror fiction – Picture Story ) John Urling Clark & Robin Beresford Evans– | 15/65 |

दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०

चाळा : भाऊ पाध्ये



# खतरनाक दौरे आणि नाट्यव्यवसाय

सौ. दया डोंगरे यांनी इकामेरीच्या अपघातानंतर पत्रकारांना मुलाखत दिली, तिला स्फोटक म्हणता येईल, हवे तर. कारण या गोष्टी कुणाला माहीत नाहीत असे नाही, किंबहुना दौऱ्यावर जाणाऱ्याने लढाईवर जाणाऱ्या जवानांप्रमाणे घरातल्या मंडळींना अखेरचे भेटून वगैरे निघावे असे म्हणण्याची वेळ आली आहे. तसे अपघात काही दौऱ्यावर जाणाऱ्या बसेसना टिप्पून होत नाहीत. ज्या ट्रकवाल्याने गोवा हिंदु असोसिएशनच्या बसला धडक दिली त्याची काही सौ. शांता जोग आणि जयराम हर्डीकर यांच्याशी दुश्मनी असण्याची शक्यता नव्हती; परंतु तरीसुद्धा दौरे असेच खतरनाक होऊ लागले तर मोठीच पंचाईत होईल यात शंका नाही. सौ. दया डोंगरे यांना आपला बस-ड्रायव्हर अपघात करणार असे वाटू लागले होते. आश्चर्याची गोष्ट अशी की, त्या ड्रायव्हरवर ओरडल्या नाहीत! कदाचित त्यांना तेवढा अवधीही मिळाला नसेल, हीसुद्धा शक्यता आहे. तर सौ. दया डोंगरे यांचे मत असे दिसते की, या दौऱ्याचा बस-ड्रायव्हरवर मनस्वी ताण पडतो आणि त्यामुळे त्याचे नियंत्रण सुटते. या मताशी कोणीही सहमत होईल. अर्थात ड्रायव्हरवरच काय, कलावंतावरही ताण पडतो. अनेक वेळा दौऱ्यावर गेलेले कलावंत गुण उधळतात, त्यामागेही हेच कारण असते. लढाईवर गेलेल्या सैनिकांची आणि दौऱ्यावर गेलेल्या कलावंतांची मनःस्थिती सारखीच असणार!

गेल्या काही वर्षांमध्ये नाटकाची ॲक्टिव्हिटी भयंकर वाढली आहे. एक महिन्यापूर्वी लागलेले 'जबरदस्त' हे नाटक आता रौप्यमहोत्सवी झाल्याचे दिमाखाने जाहिरात करत आहे. यांचे हे प्रयोग झाले कधी, त्याला यश मिळाले कसे वगैरे सर्व प्रश्न अलाहिदा. आज निर्माता कुठल्याही नाटकात पैसे घालताना, पहिले पंचवीस प्रयोग निव्वळ 'हॅमर' करता येतील की नाही, एवढाच विचार करतो. पंचवीस प्रयोग पूर्ण झाल्याखेरीज प्रेक्षकांना नाटक आवडले की नाही, हे काही ठरत नाही. कदाचित नाटक 'हॅमर' करण्यासाठी ते दौऱ्यावर नेणे सोयिस्कर ठरत असेल. मुंबईत शुभारंभाचे चार प्रयोग लावून, त्याचे अभिप्राय छापून येण्यापूर्वी ते पंचवीसएक गावांतून फिरवून आणायचे व एकदम रौप्यमहोत्सवी म्हणून प्रयोग लावायचा हा खाक्या नाटककारांना सोयीचा वाटत असेल. आता आपले व्यावसायिक मोठे मुरब्बी झाले आहेत. ते एक एक आयडिया लढवतच असतात. सध्या नाट्यव्यवसायामध्ये 'बुम पिरिअड' सुरू झाला आहे की काय, कुणास ठाऊक; परंतु बुम पिरिअडमध्ये ॲक्टिव्हिटी आणि कॅज्युएल्टी दोन्ही वाढतात. दोन्ही अपघात सारख्याच स्थितप्रज्ञ वृत्तीमुळे आपण स्वीकारू शकत नाही व ॲक्टिव्हिटीलाच दोष देतो.

वाईट वाटते याच गोष्टीचे की, काही उमेदीचे जीव निर्घृण व्यवसायासाठी बळी गेले! या व्यवसायाच्या ॲक्टिव्हिटीचा ताण निरनिराळ्या व्यक्तींवर पडतच होता आणि त्यातला बसड्रायव्हर हा सर्वांत दुबळा दुवा होता. तो कोसळला आणि व्यावसायिक मंचावरील काही उपयुक्त जीव कामी आले. त्यांची पोकळी भरून निघेलच! कालांतराने, तशी व्यवसायामध्ये कुणाचीही पोकळी कायम रहात नसते. कुठल्याही पैसा करणाऱ्या इतर व्यवसायांप्रमाणे असलेला हा व्यवसाय कलावंताच्या आणि रंगभूमीच्या संदर्भात निरुद्देश्य बनत चालला आहे आणि म्हणून या अपघाताचे वाईट वाटते.

रेनर वुल्फहार्डच्या 'डेथ बिफोर डाइंग' या चित्रातील डॉक्टरांच्या पद्धतीने म्हणायचे तर दौरे हे ठिकठिकाणच्या प्रेक्षकांची नाटकाची आवड पूर्ण करण्यासाठी नसून कलावंतांच्या जिवांशी खतरनाक खेळ करण्यासाठीच आहेत असे तीव्रतेने वाटू लागले तर नवल नाही. इतर अनेक व्यवसायांत माणसे काम करत असतात; त्यातही पैसा मिळवणे हेच उद्देश्य असते; परंतु त्यातल्या कर्मचाऱ्यांच्या जीवनाची काळजीही घेतली जाते, तशी नाट्यव्यवसायात कुठे घेतली जाते? नाट्यव्यावसाईक नाइटस् दिल्यानंतर कलावंताच्या सर्व जबाबदारीमधून मोकळा आहे. ज्याप्रमाणे तो रंगभूमीला काहीही न देण्यास मोकळा आहे, त्याचप्रमाणे कलावंतालाही. हा सर्वच प्रकार अर्थशून्य आहे. असे असूनही रंगभूमी या निरर्थक गोष्टीसाठी कुणाचा तरी खिसा भरावा या एकमेव उद्देशासाठी समाजाने, वृत्तपत्रांनी आणि कलावंतांनी, सरकारने झिजावे अशी व्यावसायिकांची अपेक्षा असतेच. एखाद्या व्यक्तीला पैसा मिळावा म्हणून समाजानेच निरनिराळे घटक असे वेठीला धरायचे, त्यांच्या जिवाशी असा खतरनाक खेळ खेळायचा, हा अधिकारच

आपल्याला, आहे, असे व्यावसायिक मानतात का ? ※

[ 'निरर्थक बाष्कळपणा' या शब्दात विनया खडपेकर यांनी या नाटकाची गेल्या अंकात ( माणूस : २६ एप्रिल ) वासलात लावलेली आहे. ही आणखी एक प्रतिक्रिया ]

# दि. पु. चा खून विनोदाचा घोळ !

एका घरात जुने नवरा-बायको आपल्या-आपल्या परीने तऱ्हेवाईक. बायको ( विद्या पटवर्धन ) बिनदांडयाच्या छत्रीचा कारखाना उभा करण्यासाठी तळमळत असते तर नवरा ( जयंत कलगुटकर ) वृत्तपत्रीय लेखन करण्याच्या तंद्रीमध्ये. दोघेही आपल्या आपल्या तऱ्हेवाईक हटवादी स्वभावाने घोळ घालून दुसऱ्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात. त्यात आणखी दोघांची भर पडते. एक कर्नल (प्रकाश बुद्धिसागर) आणि त्याची पत्नी (साधना सोहोनी). तेही तऱ्हेवाईकच. त्यांनाही वेगवेगळ्या गोष्टी करायच्या असतात. त्याच्यामुळे घोळात घोळ वाढतो. पुन्हा पुन्हा 'आपण छत्र्यांचा कारखानाच काढायचा' किंवा 'अमेरिकेला जायचं' असा प्रत्येकजण आळीपाळीने आग्रह धरत असतो नी त्यासाठी विनोदही राबवला जातो. एकूण ही मंडळी स्वास्थ्यप्रिय, इनोसंट स्नॉब्ज असतात. अचानक या मंडळींकडे एक पाहुणा येतो. दिनकर पुरोहित ( उदय म्हैसकर ). साधारण त्याच्या बोलण्याच्या लकबी स्व. जयराम हर्डीकरसारख्या आहेत. तो या मंडळींना एका खूनप्रकरणाला तोंड द्यावे लागणार आहे, असा इशारा देऊन, त्यांची घबराट उडवून जातो. त्यानंतर त्यांच्या घरात दिनकर पुरोहिताचे प्रेत सापडते. त्यामुळे ज्याला त्याला आपण आयुष्यात जे काही करायचे ठरवलेले असते ते बाजूला सारावे लागते आणि नव्या प्रसंगाला तोंड द्यावे लागते; पण दिनकर पुरोहित मेलेला नसतोच वगैरे. त्याने फक्त या मंडळींचे पाणी जोखलेले असते; एव्हढेच.

या नाटकाची जात ब्लॅक कॉमेडीची नाही, तरी ओळखीची आहे. प्रायोगिक रंगभूमीवरील म्हातारी माणसं ही प्रातिनिधिक असतात.

आयुष्याच्या चिवट आणि शिणलेल्या सूत्राचे ते प्रतिनिधित्व करतात आणि त्यांना कुठल्यातरी श्रेयाची सतत गरज असते. उदाहरणार्थ बिनदांडीच्या छत्रीचा कारखाना उभारल्यामुळे आयुष्याला येणारी पूर्तता वगैरे. ज्याप्रमाणे या म्हाताऱ्यांची आपल्याला ओळख पटते, त्याचप्रमाणे दि. पु. च्या खुनासारख्या घटनेचीही ओळख असते. या घटनेमुळे त्या म्हाताऱ्यांच्या जीवनामधला पोकळपणा, निरर्थकता उघडी करून दाखवायची असते. दि. पु. च्या खुनाचे नाटककार चं. प्र. देशपांडे हे नवोदित आहेत. तऱ्हेवाईक म्हाताऱ्यांच्या घोळात त्यांचे नाटक आवर्तने खात सापडते, त्या वेळी ते त्यातून मार्ग काढू शकत नाहीत आणि एकूण विनोदाचा घोळच होऊ लागतो. ते पुचाट वाटू लागते. अॅलन अर्किन यांना कोणी तरी त्यांच्या एका चित्रपटाचे उद्दिष्ट काय, असा सवाल विचारला असता, त्याने जबाब दिला होता, 'तो मी शोधतो आहे,' बहुधा चं. प्र. देशपांडे तसेच दि. पु. च्या खुनाचे उद्दिष्ट शोधत असावेत.

सध्याची प्रायोगिक मराठी नाटके ही Heavily विद्या पटवर्धन ह्या गुणी अदाकारावर अवलंबून असलेली दिसतात, त्यापैकी दि. पु. चा खून आहे असे म्हटले तर चूक होणार नाही. याचा अर्थ प्रकाश बुद्धिसागर यांच्या फाटक्या अंगवटीचे अस्तित्व या नाटकाला Self-redicule ची डूब आणते ती नामंजूर करण्याचा भाग नाही. तसेच विद्या पटवर्धनची भूमिका या नाटकात दुसऱ्या कलावंताच्या बरोबरीचीच आहे; परंतु विद्या पटवर्धन सहजच इतर पात्रांना प्ले ओव्हर करतात. त्यांची अंगलट ठेंगणी, पुरुषी खणखणीत आवाज याबरोबरच अर्थपूर्ण उत्स्फूर्त विक्षिप्तपणा हा चिं. वि. जोशांच्या अमर स्वभावचित्रणाला साजेसा आहे. कुठल्याही विनोदी भूमिकेत त्यांची अदाकारी सहजच खुलते. यात दि. पु. चे शव घरात मिळाल्यानंतर त्यांची अदाकारी खास आहे. आजच्या प्रायोगिक नाटकाच्या त्या 'स्टार' आहेत. किंबहुना त्यांच्या अभावी मराठी प्रायोगिक नाटक उभे रहाणार नाही की काय अशी भीती वाटू लागते. □

वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे
आवृत्ती : दुसरी
किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे